


१५ एप्रिल १९६७ : चाळीस पैसे

# माणूस

## पाठ नेहमीचीच : खंजीर कुणाचा ?



# स्वरश्री लता मंगेशकर

## वि शे षां क

प्रसिद्धि : २२ एप्रिल १९६७

किंमत : ६० पैसे

पृष्ठसंख्या नेहमीपेक्षा अधिक

या अंकातील लेखांचे मानकरी

मुखपृष्ठ क्रमांक ३ पहा

# माणूस

**एक समग्र साप्ताहिक**


वर्ष : सहावे
अंक : एकेचाळीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


## पत्र-मैत्री

स. न. मार्च ५

आपल्या १ एप्रिलच्या अंकात 'बिहारची वार्तापत्र' वाचली. बिहारच्या दुष्काळाचे हृदयद्रावक वर्णन त्यात केले आहे. 'हम मर रहे हैं सरकार' हे वाक्य वाचल्याबरोबरच बिहारी जनतेचे हाल डोळ्यांसमोर येतात. तरी पंतप्रधान श्रीमती गांधी लोकसभेत म्हणतात––" भूकबळी पडल्याचे बिहारच्या मुख्यमंत्र्यांकडून काही कळले नाही. " या माणूसच्या अंकात कित्येक भूकबळी पडलेल्यांची नावे आहेत. म्हणून या अंकाची प्रत विरोधी पक्षांचे पुढारी श्री. मधू लिमये व जॉर्ज फर्नांडिस यांना पूर्वीच पुरविली असती तर हा प्रश्न ते अधिक प्रभावीपणे लोकसभेत मांडू शकले असते. तरी विनंती ही की, 'माणूस' चा प्रत्येक अंक या पुढाऱ्यांना आपण न चुकता पाठवावा म्हणजे त्यांना लोकसभेत असे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यास मदत होईल. –ए. एस. देशमुख

## मुखपृष्ठ संदर्भ

" विरोधी पक्षांशी हातमिळवणी करून श्री. चरणसिंग यांनी संघटनेच्या पाठीत खंजीर खुपसला " या शब्दांत त्यांचा उत्तर प्रदेश काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत निषेध करण्यात आला.

# ‘ राजकीय प्रवासाची दिशा या दीड वर्षांतच ठरेल ’

**– राजाजी**

भारताच्या राजकीय मानचित्रात सध्या मोठ्या झपाट्यान बदल होत आहेत; अर्थात् हे बदल अनपेक्षित आहेत असे मात्र म्हणता यावयाचे नाही. उत्तर प्रदेशात चंद्रभानु गुप्ता आणि चरणसिंग यांच्यांतील वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला इतके चुरशीचे स्वरूप आले होते की काँग्रेस श्रेष्ठांच्या व विशेषत: इंदिरा गांधींच्या पाठिंब्यामुळे पुन्हा मुख्यमंत्रिपदाची खुर्ची हस्तगत करणाऱ्या गुप्ता यांना त्या खुर्चीतून बाहेर खेचणे हे चरणसिंगांचे मुख्य उद्दिष्ट ठरले. चंद्रभानु गुप्ता आणि चरणसिंग यांच्यांत वैयक्तिक चुरस असली तरी दोघे एकाच पातळीवरचे नेते आहेत असे मानणे चुकीचे ठरेल. गुप्ता हे अतुल्य घोष, स. का. पाटील, प्रतापसिंग कैरों यांच्या परंपरेतील. सत्तास्थानावर आपली पकड ठेवण्यासाठी कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गांचा विधिनिषेध न बाळगणारे. याउलट चरणसिंगांची प्रतिमा स्वच्छ आहे. विरोधी पक्षांतही त्यांच्याबद्दल आदर आहे आणि या आदर–भावनेला साकार रूप देण्यासाठी गेल्या निवडणुकांत कोणत्याही विरोधी पक्षाने चरणसिंग यांच्याविरुद्ध आपला उमेदवार उभा केला नव्हता. चरणसिंगांच्या विरुद्ध उभे होते ते तीन अपक्षीय उमेदवार. काँग्रेसची सर्वत्र पडझड होत असताना मतदारांनी चरणसिंगांच्या पेटीत आपली मते टाकली.

एवढे होऊनही काँग्रेस श्रेष्ठांनी मुख्यमंत्रिपदासाठी गुप्ता यांची निवड करावी याचा चरणसिंगांना संताप येणे साहजिक होते. काँग्रेस श्रेष्ठ निवडणुकीतील पराभवानंतर काहीही शिकले नाहीत, हे सिद्ध करण्याची दोन उदाहरणे म्हणजे त्यांनी सुखाडिया आणि गुप्ता यांना दिलेला पाठिंबा, आणि या दोन्ही प्रकरणांबाबत काँग्रेस श्रेष्ठांचे चांगलेच हसे झाले. राजस्थानात सुखाडिया मंत्रिमंडळच बनव शकले नाहीत तर उत्तर प्रदेशात गुप्ताजींचे मंत्रिमंडळ कोसळले. चरणसिंग आता उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री झाले आहेत.

गेल्या महिन्याभरात काँग्रेसेतर पक्षांचे मंत्रिमंडळ अधिकारावर येणारे उत्तर प्रदेश

हे आठवे राज्य आहे. परंतु या आठ राज्यांपैकी मद्रासचा अपवाद सोडला तर इतर सर्व राज्यांत कॉंग्रेसेतर पक्षांना एकतर अपक्षीय उमेदवारांचा किंवा बंडखोर कॉंग्रेस जनांचा पाठिंबा मिळवावा लागला आहे. स्वतंत्र पक्षापासून डाव्या कम्युनिस्ट पक्षापर्यंत परस्परविरोधी मतप्रणालींचे कॉंग्रेसेतर पक्ष परिस्थितीच्या दडपणामुळे सत्तास्वीकारांत भागीदारी करीत असले तरी पुरेशा संख्याबळाच्या अभावी प्रत्येक पक्षाला आपली सैद्धान्तिक भूमिका बाजूस ठेवावी लागली असून किमान कार्यक्रमाबाबत एकमताचा देखावा करावा लागला आहे. एवढे करूनही आपले आसन स्थिर होऊ शकत नाही, असे आढळून आल्यामुळे त्यांनी कॉंग्रेसमधील असंतुष्ट गटांना व कोणत्याच वैचारिक भूमिकेचा आधार नसलेल्या अपक्षीयांना जवळ केले. परंतु हे बंडखोर कॉंग्रेसजन काय किंवा अपक्षीय उमेदवार काय, केवळ सत्तेच्या लोभानेच संयुक्त आघाडीत दाखल झाले आहेत. त्यामुळे मंत्रिपदाच्या वाटणीत त्यांना पुरेशा जागा मिळाल्या नाहीत, की ते संयुक्त आघाडीच्या तंबूतून बाहेर पडण्यासाठी मागेपुढे पाहणार नाहीत. पंजाबमध्ये नुकताच जो अनुभव आला तो याच प्रकारचा आहे.

## सत्तेची खिरापत

पंजाबमधील संयुक्त आघाडीने गुरुनामसिंग या भूतपूर्व न्यायाधीशाची पक्षनेता म्हणून निवड केल्यानंतर एक निःस्पृह आणि समर्थ प्रशासक लाभला म्हणून पंजाबी जनतेने आनंद व्यक्त केला. गुरुनामसिंगांनी अवघ्या पाच सदस्यांचे आपले मंत्रिमंडळ जाहीर करताच पंजाब विधानसभेत घुसफुस सुरू झाली. मंत्रिमंडळात जनसंघास प्रतिनिधित्व लाभले असताना आपल्याला ते का नाकारण्यात आले, अशी कम्युनिस्टांकडून विचारणा होऊ लागली. कम्युनिस्टांच्या या मागणीला अपक्षीय उमेदवारांनी पाठिंबा दिल्यामुळे तिचा विचार करणे गुरुनामसिंगांना अपरिहार्य झाले. शेवटी त्यांनी सत्यपाल जंग या उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्याला मंत्रिपद दिले व चार उपमंत्रिपदे निर्माण करून त्यांचे असंतुष्टांमध्ये वाटप केले.

कॉंग्रेसची मंत्रिमंडळे गैरवाजवी मोठी आहेत, असा विरोधी पक्षांचा ठरीव आरोप आहे. परंतु कोणताही राजकीय पक्ष घ्या, त्यात सत्तास्थानांचा मोह नसणारे कार्यकर्ते वा नेते अभावानेच आढळतात. त्यामुळे हे विरोधी पक्ष सत्तारूढ होताच त्यांनाही आपली ऐसपैस मंत्रिमंडळे स्थापन करणे भाग पडले. हरियानाचे उदाहरण तर आपल्या डोळ्यांसमोरच आहे. भागवत दयाल शर्मा यांचे मंत्रिमंडळ अकरा सदस्यांचे होते व त्यात आणखी पाच–सहा जणांची भर घालण्याचा आपला मनोदय असल्याचे त्यांनी जाहीर केले. या वेळेला भागवत दयाल शर्मा ही सत्तेची खिरापत कशासाठी वाटत आहेत, असा सवाल बंडखोर कॉंग्रेसजनांचे नेते राव बीरेंद्रसिंग यांनी केला होता. योगायोगाची गोष्ट अशी की, नेमक्या दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे त्यांच्याकडे आली आणि त्यांनी जाहीर केले, मी आपल्या मंत्रि-

मंडळात सोळा सहकारी घेणार आहे; कारण मंत्रिमंडळ छोटी असली की त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. हा युक्तिवाद वरवर दिसावयास ठीक असला तरी त्यामागे मूळ प्रवृत्ती एकच आहे. शक्य तितक्या अधिक असंतुष्टांचा समावेश करून आपला राज्यशकट हाकण्याचे आपले कार्य निर्वेध करणे. याविना या युक्तिवादामागे दुसरा कोणताच हेतू नव्हता.

गुरुनामसिंगांनी आपल्या मंत्रिमंडळाची अशीच वाढ करून असंतुष्टांना राजी करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ते असंतुष्ट संतुष्ट झाले; परंतु आणखी काही नवे असंतुष्ट जन्माला आले आणि त्यांनी विरोधकांशी संगनमत करून गुरुनामसिंग मंत्रिमंडळाचा विधानसभेत पराभव केला. ज्याप्रमाणे उत्तर प्रदेशातील काँग्रेसेतर पक्षांनी चरणसिंग यांची मुख्यमंत्रिपदी निवड करून त्यांच्या बंडखोरीचे त्यांना पारितोषिक दिले आहे तसेच जर पंजाबमध्ये काँग्रेसच्या ग्यानसिंग राडेवालांची राजवट सुरू झाली तर या असंतुष्टांनाही त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणे बक्षीस मिळाले तर आश्चर्य वाटावयास नको.

गेल्या महिन्याभरातील काँग्रेसचा काय किंवा काँग्रेसविरोधी पक्षांचा काय, मंत्रिमंडळांचा बनाव पाहिला की आपल्या देशातील सर्वच राजकीय पक्ष केवळ सत्ताभिमुख झाले आहेत हे दिसून येते. उपराष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी या सत्ताकांक्षेमुळे राजकीय कार्यकर्त्यांचे सार्वजनिक जीवन कमालीचे गढूळ झाल्याबद्दल नुकतीच चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, दरोडेखोरांच्या टोळीमध्येही नेतृत्वासंबंधी जी किमान निष्ठा असते तेवढी निष्ठाही राजकीय कार्यकर्त्यांमध्ये आढळून येत नाही.

किमान कार्यक्रमाच्या गोंडस आणि साळसूद आवरणाखाली एकत्र आलेल्या काँग्रेसेतर पक्षांच्या मंत्रिमंडळाची वाटचाल बिकट वाटते ती याच संधिसाधू वृत्तीच्या कार्यकर्त्यांमुळे. परंतु आपल्यामुळे मंत्रिमंडळ फुटले असा आरोप आपल्यावर येऊ नये या भीतीने सर्व काँग्रेसेतर पक्षांनी आपले संयुक्त संसार थाटले आहेत. मतदारांमधील जळजळीत काँग्रेसविरोध एवढ्या एकाच पायावर ही मंत्रिमंडळे उभी आहेत. सध्याच्या परिस्थितीत ते अपरिहार्य आहे हेही मान्य करावयास हवे; कारण या किमान कार्यक्रमाचे आकर्षण प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनाही वाटू लागले आहे. राष्ट्रपतींच्या भाषणाबद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या ठरावावर लोकसभेत जी चर्चा झाली तिला उत्तर देताना श्रीमती इंदिरा गांधी यांनी विरोधी पक्षांना राष्ट्रहित डोळ्यांपुढे ठेवून किमान कार्यक्रमाच्या आधारे केंद्र सरकारशी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

केंद्र सरकारचा गाडा आर्थिक अडचणींमध्ये रुतून बसल्याची जाणीव काँग्रेस श्रेष्ठांनाही झपाट्याने होऊ लागली आहे. गले वर्षभर घोळ घालूनही अजून चौथ्या योजनेला मुहूर्त सापडत नाही याचे कारण द्रव्यबळाचा अभाव हेच आहे.

अशा परिस्थितीतच निम्म्या राज्यांमध्ये विरोधी पक्षांची मंत्रिमंडळे सत्तारूढ झाली आहेत. त्यामुळे भाववाढ रोखणे आणि शेती व औद्योगिक उत्पादनात वाढ करणे या राष्ट्रीय जीवनमरणाच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विरोधी पक्षांना सहकार्याचे आवाहन करण्यावाचून प्रधानमंत्र्यांना गत्यंतर उरलेले नाही. आर्थिक प्रश्नांप्रमाणेच राष्ट्रीय एकात्मता कशी वाढीस लावावयाची हीदेखील केंद्र सरकारपुढील महत्त्वाची समस्या आहे, असे राजाजींनी नुकतेच म्हटले आहे.

## सामना अटळ

ही सर्व परिस्थिती ध्यानात घेतली म्हणजे केंद्र सरकारला येत्या वर्षा–दीड वर्षाच्या आत अंतर्गत पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागणार आहे व त्या वेळी एका बाजूला इंदिरा गांधी आणि त्यांचे मित्रमंडळ व दुसऱ्या बाजूला खंबीर नेतृत्वाबद्दल प्रसिद्ध असलेले मोरारजी देसाई, असा सामना होणे अपरिहार्य ठरणार आहे. राजाजींची राष्ट्रीय सरकारची सूचना आज काँग्रेस-श्रेष्ठांना अव्यवहार्य वाटत असली तरी या आगामी पेचप्रसंगाच्या वेळी इंदिरा गांधी काय किंवा मोरारजी देसाई काय, दोघांनाही विरोधी पक्षांचा हात मदतीसाठी घ्यावा लागणार आहे. आज एकजुटीने उभ्या असलेल्या विरोधी पक्षांपैकी कोणकोणते विरोधी पक्ष आपल्या पाठीशी उभे राहतील, याचा अंदाज प्रधानमंत्री आणि उपप्रधानमंत्री बांधू लागले असल्यास नवल नाही. विरोधी पक्षांनाही याची चाहूल लागली आहे. त्यामुळे पी. राममूर्तींसारख्या डाव्या कम्युनिस्ट नेत्याच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या संयुक्त आघाडीत आपण किती खोलवर जावयाचे याचा स्वतंत्र पक्ष, जनसंघ व प्रजासमाजवादी पक्ष यांना विचार करावा लागणार आहे; कारण इंदिरा गांधी विरुद्ध मोरारजी देसाई असा संघर्ष उद्‌भवला तर संयुक्त समाजवाद्यांसह सर्व डावे पक्ष मोराजीभाईंना पराभूत करण्याच्या एकमेव उद्देशाने इंदिरा गांधी यांच्या बाजूने उभे राहण्याची शक्यता आहे. त्या वेळी आपण कोठे उभारावयाचे हे स्वतंत्र, जनसंघ व प्र. स. या पक्षांना ठरवावे लागेल आणि त्याची आताच चाहूल घेऊन आपल्या वाटचालीची दिशा निश्चित करावी लागणार आहे. कारण परिस्थितीच्या दडपणामुळे एकत्र आलेल्या राष्ट्रवादी शक्ती आणि कम्युनिस्ट शक्ती दीर्घकाल हा एकजुटीचा देखावा करू शकणार नाहीत. भारताच्या यापुढील वीस–पंचवीस वर्षांच्या राजकीय प्रवासाची दिशा येत्या दीड–दोन वर्षांत ठरणार आहे, असे राजाजींसारखा मुरब्बी मुत्सद्दी म्हणतो ते याच अर्थाने.

●

**सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## □ चरणसिंगांचे हरण

दिल्लीवर कुणाची सत्ता असावी याचे उत्तर ज्या प्रदेशांत आहे तेथे नुकतेच मोठ्ठं हरण आले. सीता–हरण, सुभद्रा–हरण, रुक्मिणी–हरण किंवा स्वेटलाना–हरण या आपल्या भारतात गाजलेल्या हरणांपेक्षा हे हरण गंभीर आहे. या सर्व पूर्वी झालेल्या हरणांत वेषांतर महत्त्वाचे होते.

भिक्षा द्याया गेल्ये रेघेच्या बाहेर । सासूरमाहेर बुडवाया
रेघेच्या बाहेरी जसा दिला पाय । झाला महाकाय दशमुख ।।

असे कपट रावणाने केले व सीतेने हा आकांत केला. ( चांडाळ कुठला ! )

सुभद्रा–हरणात यतिवेषात अर्जुन होता ही जमेची बाजू होती. आणि दोघांचे जमलेले होतेच ! यामुळे––

नीट दटावुनी जाय सुभद्रा हरूनी तो पार्थ ।
मारिती हाका केवळ, नागविला वनि जसा वणिक सार्थ ।

अशीच बळरामाच्या पक्षपात्यांची गोड अवस्था झाली.

रुक्मिणी–हरणात :

कपोली बाळेच्या अपरिचित रोमांच उठती
तयेचे चोळीचे सकल नवदाणे उतटती ।

इत्यादी गंमतीदार प्रकार झाले.

स्वेटलाना–हरणात तिचा तिसरा पती ब्रजेशसिंग बिचारा मृत्यू पावलेला. अशा स्थितीत हस्तिनापूरला ती वेषांतराने आशेने आली. तिथे मात्र––

सुशीला तन्वंगी इंदु वरता जी दचकली ।
कृपाळे दीनेशे त्वरित चहु हाती उचलली ।।

दिनेशसिंगाने काय केले, याचे वर्णन तिने आता अयोध्यानगरीतील लोहपुरुष राम मनोहर यांना पत्राने कळवले आहे.

पुरुषांच्या ताब्यातील स्त्री पळवावी हा सर्व हरणांचा विशेष असतो. या हरणात मात्र एका स्त्रीच्या ताब्यातील पुरुषाला पळवण्यात आले आहे. मामला गंभीर आहे. इंदिराजींना सोडून चरणसिंग पळवले गेले आहेत !

उत्तर प्रदेशाची परंपरा केवढी ! जवाहरलाल नेहरू, लालबहादुर शास्त्री, रफी अहमद किडवाई हे शांतिकारक, चंद्रशेखर आझाद यांसारखे क्रांतिकारक, आचार्य नरेंद्र देवांसारखे दैन्यहारक, गोविंद वल्लभ पंत, चंद्रभानु गुप्ता, असफ अली यांच्यासारखे कॉंग्रेसकारक, अशी किती नावे सांगावी ? १९६२ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला या प्रांतात ४३० पैकी २४९ जागा मिळाल्या. १९६७ साली विरोधी पक्षाला थोडी संधी देण्यासाठी कॉंग्रेसने आपापसात भांडणाचे नाटक करून ४२६ मधील फक्त १९८ जागा आपल्याकडे ठेवल्या. निवडणुका संपल्यावर प्रजासमाजवादी पक्षातून पळवलेला गेंडासिंग ( उंदीर भक्षक ) आदी पंधरा-वीस लोकांच्या पाठिंब्यावर राज्य करणाऱ्या सौ. सुचेता कृपलानी यांच्या मंत्रिमंडळाला मूठमाती मिळाली. ( या बाईंना आपला नवरा मुठीत ठेवता येत नाही. झाले हे ठीक झाले.) कॉंग्रेस ही कम्युनिस्टधार्जिणी होत चालली, या टीकाकारांच्या टीकेला वाव नको म्हणून के. डी. मालवीय, सुभद्रा जोशी, अन्सार हरवानी, आदी कांग्रेसच्या तिकिटावर उभ्या राहिलेल्या सहप्रवाशांना योजनापूर्वक रीतीने पक्षातील लोकांनीच निवडणुकीत पाडले. अशा रीतीने चंद्रभानु गुप्तांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले मंत्रिमंडळ यावच्चंद्र दिवाकरौ राज्य करील, असे आम्हांला वाटत होते ! मंत्रिमंडळ स्थापन झाले. शपथविधी झाला. इतक्यात चरणसिंगांचे हरण झाले.

काय म्हणावे या बदमाषीला ! वडिलांना पुण्याला जातो सांगून, पैसे घेऊन, संमती घेऊन, बोरीबंदरला गाडीत बसवलेला कार्टा, कल्याणला गाडी बदलून नाशिकला गेला तर हा वडिलांचा पराभव कसा काय ? ही त्या कार्ट्याने केलेली बेइमानी व फसवणूक होय. त्याला एकदम अस्थि-विसर्जनाला नाशिकला जावेसे वाटू लागेल व कल्याणकारी मार्ग त्याने सोडायचे ठरवले, तर त्याने पुनः बोरीबंदराला येऊन बापाला विचारले पाहिजे. पुनः संमती घेतली पाहिजे. आमचे म्हणणे चरणसिंग व त्यांचे सतरा चरणदास यांनी कॉंग्रेस मतदारांशी बेइमानी केली आहे. त्यांनी राजीनामा दिला पाहिजे व पुनः विधायक दलाच्या तिकिटावर वाटल्यास निवडणुका लढवल्या पाहिजेत !

अशा रीतीने पूर्वी सुचेताबाईंनी गेंडासिंगाला पळवले, जवाहरलाल यांनी अशोक मेहतांना, पाटलांनी पट्टमथानूंना पळवले. आम्ही नाही म्हणत नाही पण ही पळवलेली माणसे आपण पळून आलो आहोत, धन्यामागून शेपटी हलवत जावे, तसं चालायला हवं हे कधी विसरली का ? चरणसिंगांचे हरण यातले नाही. चरणसिंग हे पळाले आणि शिवाय मुख्यमंत्री झाले ! अशा मतदारांना फसवणाऱ्यांना मुख्यमंत्री करणे जनसंघ, सं. सो. पा., प्र. सो., लालभाई यांना शोभते का ? आम्ही

इशारा देतो की अशा तऱ्हेने विरोधी पक्ष वागणार असले तर आम्ही गुरुनाम सिंगांना पळवू किंवा पळायला लावू.

रस्त्यांत दंगेधोपे झाले की, आतापर्यंत सैन्याला बोलवण्याची आमची पद्धत आहे. मंत्रिमंडळातून असे दंगेधोपे झाले तर सैन्य न बोलवता येईल ! मग आम्हांला दोष देऊ नका.

## ☐ मेनन म्हणत्यात मला —


कुणी थोर पुरुष गेला की, " त्यांच्या निधनामुळे रिकामी झालेली जागा भरून येणे शक्य नाही, " असे म्हणण्याची घाऊक पद्धत आहे. परंतु गेलेला थोर पुरुष जर विधानसभेचा किंवा लोकसभेचा सदस्य असला तर सहा महिन्यांतच ही जागा भरून येते. या न्यायाने ईशान्य मुंबईत पुन्हा निवडणूक आली आहे. बर्वे–मेनन लढत वरचढ असतानाही जर जनसंघाने सर्व धोका पत्करून प्रा. मुकुंदराव आगासकरांना उभे केले तर आता कै. बर्वे यांच्या भगिनी रंगणात असताना आगासकर माघार घेणे शक्य नाही, अशी मेनन यांची खात्री होती ! या भरंवशावर त्यांनी जाहीरपणे सांगितले,

" या निवडणुकीतून जनसंघ माघार घेईल तर बरे; म्हणजे सामना सरळ होईल. " मेनन यांनी हा डाव टाकला होता. जनसंघाची आपल्याला भीती वाटतच नाही, असा हा धूर्त पवित्रा होता. परंतु भरंवशाच्या म्हशीला टोणगा व्हावा त्याप्रमाणे आगासकरांनी माघार घेतली ! मेनन दचकले. म्हणजे ही ८०,००० मते आता जर या बैलपोळ्यांत सामील झाली की, पुरता बाजा ! या जनसंघवाल्यांचे म्हणजे असे असते, की ठरले म्हणजे ठरले. तिकडे पुण्याला एस्. एम्. ना मते द्यायचे ठरले. अगदी धो धो मते. समाजवाद पाहिला नाही–काही नाही ! जर सप्रेबाईंना मते द्यायचे जनसंघाने ठरवले तर मेनन यांना निवडणुकीत फेफरे येईल. सप्रेबाई निवडून आल्याच तर मागील निवडणुकीत जो खर्च आला तेवढी थैली काँग्रेसपक्षाने त्यांना जाहीर सत्काराने द्यावी, अशी आमची प्रेमळ सूचना आहे.

कृष्ण राधा खेळती होरी  
जळो बळजोरी  
मुकुंदा मारो पिचकारी ।।

●

—ग्यानबा



## व्हेनेझुएलातील सरकार उलथून पाडण्यासाठी झालेला एक प्रयत्न....

अनुवाद
शं. प. साठे

# मेंढरू हरवलं पण....

" आणि जर क्यूबाच्या कॅस्ट्रो राजवटी-विरुद्ध पॅन अमेरिकन संघटनेने कठोर उपाययोजना केली नाही तर या संघटनेचे दूरदृष्टचा राजकीय दिवाळे निघाले आहे, असे म्हणावे लागेल. "

बैठकीचा एकूण सूरच गंभीर होता. लॅटिन अमेरिकेतल्या ' ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स् ' या संघटनेतील राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक चालू होती. विषय महत्त्वाचा होता. लॅटिन अमेरिकेत कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित व्हावी म्हणून रशियन क्यूबा अॅक्सीस-कडून जे हस्तक्षेप, जी सशस्त्र आक्रमणे आणि जी गनिमी युद्धाची तयारी चालली होती, त्या संबंधांत बोलताना व्हेनेझुएलाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी वरील इशारा दिला. आपल्या देशातील राजवट उलथून पाडण्यासाठी क्यूबाने ज्या तऱ्हेच्या हाल-चाली चालवल्या होत्या त्या मुद्दाम बोला-विलेल्या या बैठकीत पुराव्यानिशी व्हेने-झुएलाचे हे परराष्ट्रमंत्री सांगत होते. या हालचालींचा गंभीरपणे विचार करावा आणि क्यूबाला आक्रमक ठरवून उपाय-योजना करावी, असा त्यांचा आग्रह होता.

ज्या एका जागरूक राष्ट्रभक्ताच्या सूचनेमुळे या सर्व घातपाती कटांचे धागे-दोरे व्हेनेझुएलाच्या सरकारच्या हाती आले व ज्यामुळे सरकार खडबडून जागे झाले, त्या कटाची हकीकत ही अशी —

व्हेनेझुएलाच्या पॅरेग्वाना नावाच्या भूशिराच्या उत्तरेकडील किनाऱ्यावर मकामा नावाचा एक अगदी एकांतातील लहानसा वाळवंटी किनारा आहे. या वाळवंटी किनाऱ्यापासून अर्धा मैल आत एका गरीब धनगराचे लहानसे घर आहे. त्या कुटुंबातील लिनो जरार्डो अमात्रा हा २४ वर्षांचा तरुण आणि त्याचा १८ वर्षे वयाचा भाऊ पेद्रो असे दोघेजण दि. १ नोव्हेंबर १९६३ च्या सकाळी आपले हरवलेले मेंढरू हुडकण्यासाठी वाळवंटी किनाऱ्यावर इकडे तिकडे हिंडत होते.

त्या वेळी त्यांना स्नानाच्या पोशाखात असलेले दोन गृहस्थ किनाऱ्यावर समुद्राकडे पाहत उभे असलेले दिसले. त्यांचेजवळच एक चकाकत असलेली, एंजीनवर बसवलेली १६ फुटी ॲल्युमिनियमची मोटार बोट दिसली. एकमेकांची नजरानजर होताच; त्यांपैकी उंचेला असा जो होता त्याने हात हालवून म्हटले, "हॅलो फ्रँक, तुझे ठीक आहे ना. अजून तू क्रिओल कंपनीकडेच काम करतोस ना?"

"मी फ्रँक नव्हे, आणि मी क्रिओल कंपनीकडे कामही करत नाही," लिनो उद्गारला. लिनोला काही त्या दिवशी त्याचे मेंढरू सापडले नाही; पण परत संध्याकाळी ५ च्या सुमारास जरा आधी तो आणि त्याचा भाऊ मासे धरण्याच्या काठ्या हातात घेऊन परत किनाऱ्यावर आले. सबंध दिवसभर सकाळी ते दृश्य पाहिल्यापासून लिनोच्या मनात सारखे विचार, शंका येत होत्या, की किनाऱ्यावर ते दोघे संशयित इसम काय करत असावेत, त्यांचे तेथे काय काम असावे? किनाऱ्यावर त्यांना ती मोटार बोट तशीच असलेली दिसली आणि आणखीही काही संशयास्पद गोष्टी आढळून आल्या. काही वेळापूर्वीच वाळू तुडविणारांच्या पायाच्या खुणा उमटल्या होत्या. पावलांचे ठसे उमटले होते. बोट बांधावयाच्या दोराच्या होणाऱ्या खुणा किनाऱ्यावरील एका झाडाचे दिशेने उमटलेल्या दिसत होत्या.

त्या खुणांच्या अनुरोधाने लिनो निघाला. पेद्रोही त्याचे मागे होताच. खुणा संपत होत्या तेथे त्यांना कॅन्व्हासच्या कापडाचा तुकडा वाळूतून वर आलेला आढळला. त्यांनी तो तुकडा खेचून पाहिला. मग वाळू बाजूला सारून तो वर काढण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांना तेथे एक मोठी काळी पिशवी आढळली. ती पिशवी वर काढून तिचे तोंड मोकळे करताच त्यांना त्या बॅगमध्ये चार ॲटोमॅटिक रायफल्स व काडतुसांच्या पट्ट्यांचा ढीग आढळला. तसे त्यांनी आणखी उकरावयास सुरुवात केल्यावर त्यांना आणखी पिशव्या व त्यांत आणखी रायफल्स आणि काडतुसांच्या पट्ट्यांचे गठ्ठे आढळले. आता ते उकरून काढणे जास्त कष्टाचे होते. आणि हा साठा बराच मोठा असावा असे आढळून येत होते. हे सर्व लक्षात आल्यावर लिनो उठला आणि आपल्या भावाला म्हणाला, "हे सर्व आपण पोलिसांना कळवले पाहिजे."

आणि आज रात्री १० चे जरा आधी पोलिस स्टेशनमध्ये लिनो येऊन दाखल झाला. आणि त्याने तेथील अधिकाऱ्यांना—ॲंटोनिओला आणि ऑलिव्हर्सला—

आपली सर्व हकीकत सांगितली. ताबडतोब पोलिस त्या ठिकाणी गेलें आणि शोधा-शोधीस सुरुवात झाली. पंधरा मिनिटांतच ऑलिव्हर्सला बरेच काही सापडले आणि त्याने आपल्या जीपमधील वायरलेस सेटवरून ती सनसनाटी बातमी त्या विभागाचा गव्हर्नर वाबलो साहर याला दिली.

तो दडवून ठेवलेला शस्त्रांचा साठा वर काढावयास चार तास लागले. खणलेली जमीन आठ फूट खोल, सहा फूट रुंद व नव्वद फूट लांब होती. शस्त्रास्त्रे, अँटोमॅटिक रायफल्स, मशीनगन्स, रणगाडाविरोधी बंदुक, उखळी तोफा, सुरुंग व लाखो फैरींचा दारूगोळा वगैरे तीन टन वजन भरेल एवढा सापडला.

व्हेनेझुएलाच्या राजधानीत, कॅराकसमध्ये राष्ट्रध्यक्ष रोम्युलो बेटान कोर्ट यांना झोपेतून उठवून फोनने सर्व हकीकत थोडक्यात सांगण्यात आली. त्यांनी ताबडतोब सर्व किनाऱ्यावर आरमारी पहारा व गस्त सुरू करण्याचा हुकूम दिला आणि संरक्षण दलांना सज्ज राहण्याचा हुकूम देऊन महत्त्वाच्या ठिकाणांवर सज्जता ठेवली.

## फ्लॅट नं. ४९

व्हेनेझुएलाच्या मध्यवर्ती कार्यालयात मुख्य अधिकाऱ्याने त्यांचेकडे आलेल्या संपूर्ण रिपोर्टचा काळजीपूर्वक अभ्यास केला आणि दि. ३ नोव्हेंबरला म्हणजे लिनोने खबर दिल्यानंतर ४८ तासांनी सर्व जमा झालेल्या माहितीच्या आधारावर संशयित म्हणून कम्युनिस्टांशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या एका तरुण स्त्रीवर पाळत ठेवण्यास सुरुवात झाली. ती स्त्री कम्युनिस्ट प्रमुख मिचार्डो याच्या घराजवळ आढळून आली. नंतर ती नेग्रीन स्ट्रीटवरील एका हॉटेलात गेली. तेथे ती इतर तीन माणसांशी गप्पागोष्टी करत काही वेळ थांबली. साधारण तासाभराने ते चौघेही मोटारने चार इमारती असलेल्या व उखानिझासिअन् सिमान रॉड्रिग्ज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कॉलनीत गेली.

त्या कॉलनीतील इमारत नं. १ कडे ती स्त्री गेली. इमारतीच्या बाहेरच असलेल्या लिफ्टने चौथ्या मजल्यावरील ४९ नंबरच्या गाळ्याकडे ती गेली. तिचे साथीदार तिचा पाठलाग होत नाही ना, हे टेहळण्यासाठी बाहेरच रेंगाळत राहिले. तेथील काम आटोपून ती मोटारने शहराच्या जुन्या भागात गेली. तिथे ती युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थी-संघटनांच्या प्रमुख कार्यकर्त्यांना भेटून चर्चा करत असलेली आढळली. त्या प्रमुखांपैकी काही नुकतेच क्यूबाहून आलेले होते.

इन्स्पेक्टर कारसिआ यांना खात्री वाटत होती की फ्लॅट नं. ४९ मध्ये काही महत्त्वाचे घडत असावे. सावधगिरीच्या दृष्टींनी आवश्यक त्या अनेक गोष्टी करण्यात आल्या आणि शेवटी त्यांनी आपल्या प्रमुखांना त्या जागेवर छापा घालण्याची विनंती केली. मध्यरात्रीनंतर थोड्याच वेळात सुरक्षा पोलिसांपैकी ५ लोक दोन तुकड्यांत त्या इमारतीभोवती गप्पागोष्टी करण्याचे मिषाने रेंगाळत राहिले. इन्स्पेक्टर कारसिआ

आपल्या दोन हस्तकांसह चौथ्या माळ्यावर गेले आणि मग बाकीचे त्या इमारतीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर उभे राहिले.

इन्स्पेक्टर कारसिआंनी फ्लॅट नं. ४९ चा दरवाजा हळूच ठोठावला. आत सपातांचा आवाज त्यांस ऐकू आला. दरवाजा उघडला गेला आणि रात्रीचा गाऊन पेहरलेली एक मध्यमवयीन स्त्री त्यांचेसमोर उभी राहिली. "आम्ही झडतीचे वॉरंटसह आलो आहोत." इन्स्पेक्टर कारसिआ म्हणाले. "आणखी कोणी आत आहे काय?" "नाही" त्या स्त्रीने उत्तर दिले. झडतीला सुरुवात झाली. शयनगृहात त्यांना कॉटवर एक तरुण निजलेला आढळला. "हालचाल करू नकोस. आहे त्या स्थितीत राहा." इन्स्पेक्टर म्हणाले. "तुझे नाव काय?" "जर्मन लोपेझ मेनडेझ." तो तरुण गृहस्थ उद्गारला, आणि त्याने आपले ओळखपत्र पुढे केले. पत्रावर नंबर ६१८९४५ जर्मन लोपेझ मेनडेझ. जन्म २७ नोव्हेंबर १९४१. पाच फूट सहा इंच, केस करडे, डोळे पिंगळे. आणि डाव्या बाजूला लहान ओळख फोटो चिकटवला होता. फोटोत व त्या तरुण्यात साम्य होते.

"तुझा धंदा काय?" कारसिआ म्हणाले.

"मी शिक्षक आहे आणि थोड्या दिवसांकरता येथे आलो आहे," तो तरुण उद्गारला.

## ती बायबलची प्रत

सुरक्षा पोलिसांनी नं. ४९ च्या गाळ्याची कसून झडती घेण्यास सुरुवात केली. टपालपेटी, टेबले, टेबलचे ड्रावर्स; कॉटचे खाली, पाण्याच्या टाक्या आदी सर्व संभाव्य जागा तपासण्यास सुरुवात केली आणि त्या तरुण गृहस्थाचे कॉटखाली त्यांना काही सापडले.

एक निळ्या रंगाची पेन्सिल, ड्रॉइंग काढण्याच्या साधनांनी भरलेली पेटी, ट्रेसिंग पेपर, आखपट्टी, कंपास आदी वस्तूंनी भरलेली एक हवाई बॅग सापडली.

"या ड्रॉइंग काढण्याच्या साधनांनी तू काय करतोस?" कारसिआंनी विचारले.

"मी या वस्तू पाहिल्यासुद्धा नाहीत." लोपेझ त्रासलेली मुद्रा करून म्हणाला. दुसरी सापडलेली वस्तू म्हणजे पुस्तकाच्या आकाराच्या चामड्याच्या वेष्टनात गुंडाळलेल्या त्या प्रतीमध्ये सुट्या पानांचे एक नोटबुक ठेवलेले आढळून आले. कारसिआंनी त्याची सुमारे सत्तर पाने उलटून पाहिली. आणि त्यांस आढळून आले की स्फोटक द्रव्ये व हत्यारे कशी हाताळावी याची माहिती देणारे ते एक FALN या गुप्त संघटनेने प्रसारित केलेले माहितीपत्रक आहे.

कारसिआंनी लोपेझकड पाहत विचारले, "हे बायबल तुझे काय?" लोपेझ म्हणाला, "नाही".

पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास आपल्या दोन संशयितांसह कारसिआ मुख्य ठाण्याकडे आले. येताना आपल्या दोनही सहकाऱ्यांना आपला तपास चालू ठेवण्या-

बद्दल त्यांनी सांगितले. " गाद्या, उशा, सर्व काही तुम्ही तपासलेले सर्व परत तपासा, आपणांस सापडले त्यापेक्षा अधिक काहीतरी असले पाहिजे. "

पोलिस फाईलमधील माहितीप्रमाणे जी बाई स्वतःला नर्स म्हणवत होती ती FALN च्या पुढाऱ्याशी संबंधित होती. स्वतःला लोपेझ म्हणवून घेणाऱ्याचे हाताचे ठसे तपासले असता आणि त्याची माहिती चाळली असता त्याचे लुईस एडआर्डो सान्झ माह्रेटो असे नाव आढळले. गुप्त माहिती-पत्रिका सापडली होती त्यातील मार्जिनमध्ये त्याचे हस्ताक्षरातील अनेक नोंदीत त्याचे २१ ऑक्टोबरचे कार्यक्रमाचे वेळापत्रक सापडले, ते असे : सकाळी ६ वाजता उठला. ८ ते १२ तोफखान्याच्या उखळी तोफांचे शिक्षण. दुपारी २ ते ६ रिकॉइल्स मशिनगन्स आदींचे शिक्षण. ८ ते १० अभ्यास. ११ ला झोप. असा दैनिक कार्यक्रम आढळला.

## धुक्यातून स्पष्ट चित्र

गाळा नं. ४९ मध्ये मधल्या काळात (तपास तिकडे चालू असता) तपासात कपाटाचे एका ड्रॉवरला त्याचे तळाला दोन इंच जाडीचा कागदाचा थर चिकट टेप लावून चिकटवून ठेवलेला आढळला. तेथे सापडलेल्या कागदपत्रांत हत्यारे व स्फोटक द्रव्ये यांची सविस्तर माहिती, घातपाती कृत्ये, पळवापळवी कशी यशस्वी करावी, यांची माहिती, तसेच यशस्वी रीतीने पळून निसटून जाण्याचे मार्ग, धोक्याचे इशारे देण्याच्या पद्धती, आश्रयाची ठिकाणे, आदींची माहितीही संकलित केलेली आढळली.

तसेच राजधानीचा एक संपूर्ण नकाशा, सर्व रस्ते, मुख्य मुख्य इमारती दाखवणारा नकाशा मिळाला. नकाशाकरिता चार कागद वापरले होते. नकाशावर वर्तुळे, बाण, फुल्या, जोडरेषा, त्रिकोण, आदी अनेक खुणा रेखीत केल्या होत्या.

त्या खुणांचा अर्थ काय, हे शोधण्यासाठी त्याचा अभ्यास सुरू झाला. त्यात वापरलेल्या कोडवर्डसचे खालील अर्थ निघू लागले. F : इंधन, Fero : व्यक्ती, M : मॉर्टर्स, B : बझुका इ. आणखी खोलात जाऊन अभ्यास केला गेला. शस्त्रास्त्रांचे नावांप्रमाणेच महत्त्वाच्या इमारती, रस्ते, कार्यालये यांची नावे सांकेतिक अक्षरांनी हत्यारासारखीच उल्लेखली होती. ही सांकेतिक भाषा, शब्द यांचे अर्थ लावून त्याप्रमाणे नकाशाची तुलना करून पाहण्यात आली. दोन–दोनदा नवीन नकाशावर ते पडताळून पाहण्यात आले. आणि मग जे अस्पष्ट होते त्याचे एक सुंदर चित्र उभे राहिले. काटकोन चौकोन म्हणजे तोफखाना; त्रिकोण म्हणजे ठराविक मंडल, गोल म्हणजे सैन्याच्या बराकींच्या जागा, फुल्या धोक्याची ठिकाणे, पंचकोन बाणांनी दाखविलेले म्हणजे हल्ल्यांची लक्ष्ये, सांझ मिराडोने एक अगदी सविस्तर कॅरेकसवरील हल्ल्याचा व त्याकरिता पुरविलेल्या शस्त्रांचे साठ्याचा नकाशा तयार केला होता.

सैन्याच्या बराकी हा हल्ल्याचा मुख्य रोख होता. त्या बराकी शहराच्या एका उंच भागावर तटबंदीत होत्या. तेथे सैन्य एकवटलेले होते. या ठिकाणी रणगाडेही होते. योजना अशी होती. सैन्याला अलग पाडून जेलमधील कैद्यांची सुटका करावयाची व त्यांना हल्ल्यात सामील करून घ्यावयाचे. या लढ्यातील एका भागासाठी, तीन तोफखाना युनिटस्, प्रत्येकी तीन ते चार लोक असलेले सहा स्थानिक गट, १२ क्रांतिकारी सैन्याची–FALN ची–युनिटस्, यात एकूण उपयोगात आणली जावयाची होती. म्हणजे या कामाकरिता ३७५ माणसे, १९५ रायफल्स, ८ उखळी तोफा, १२ बझ कार्टस्, ४ रिकॉइल गन्स, ७५ मशीन गन्स उपयोगात आणली जाणार होती.

बरॅकजवळील मोर्च्यांची निवड अशा तऱ्हेने केली होती की, गनिमी सैनिकांना ते सैनिक आपल्या बरॅक्स्मधून जिप्सकडे आणि आर्म्स कारकडे जात असताना त्यांचेवर गोळीबार करता यावा. मॉर्टर्सही प्रवेश द्वारावर रोखून ठेवले होते. घातपाती युनिटस्नी टेलिफोन तारा तोडावयाच्या होत्या. पॉवर हाऊसेस ताब्यात घ्यावयाची होती आणि मुख्य रस्ते उडवून देऊन त्यांत अडथळे आणावयाचे होते. बझूकार्स आणि रिकॉईल्स गन्सनी टँक्सचा समाचार घ्यावयाचा होता. जर त्या आपल्या जागांतून बाहेर पडल्या तर !

राष्ट्रध्यक्षांना ही सर्व योजना दाखविण्यात आली. " ज्यांना गेल्या तीन वर्षांतील FALN च्या खून, लूट, जाळपोळ, दहशतीची व घातपाती कृत्ये माहीत आहेत, त्यांना ही योजना वाचून आश्चर्य वाटणार नाही." राष्ट्राध्यक्षांनी आपल्या अधिकारी वर्गाशी विचारविनिमय केला व त्यांनी म्हटले, " पण जगाला, बाहेरच्या लोकांना हे सर्व अशक्य कोटीतील वाटेल." आणि खरेच की बाहेरचे जग यावर विश्वास ठेवण्यास तयार होईल काय ? आपण हा नकाशा कुठे तयार झाला, ही हत्यारे कुठून आली, त्यांचे प्रवर्तक कोण हे सिद्ध करून शकू काय ? हा विचार त्यांचे डोळ्यांसमोर उभा राहिला.

आणि तपासाची दृष्टी प्रथम सान्झ मेरेडोवर एकवटली. सर्व विमानवाहतूक कंपन्यांचे ऑफिसमधून त्यांतील प्रवाशांची माहिती तपासण्यात आली. हे त्रासाचे व जिकिरीचे काम होते. पण त्याला फलप्राप्त झाले. सान्झ मेरेडो हा व्हेनेझुएलामधून जमेकाला १९६२ च्या ५ मार्चला पळून गेला होता. त्याने यादीत नाव लुईस, सी, सान्झ एम असे नोंदले होते. या फरारी होण्याचे कारण, एका आर्म्ड कारच्या चोरीच्या प्रयत्नात तो अयशस्वी झाला होता. कारमधील सापडलेल्या बोटांच्या ठशांवरून हे कळून आले होते. आणि जमेकाहून एका खास विमानाने तो हवाना-क्यूबाला गेला होता. आणि विमान कंपनीला त्याने आपला पत्ता हाऊस ऑफ अमेरिका असा दिला होता. ( हे हवानामधील लॅटीन अमेरिकन देशांतील कम्युनिस्टांना घातपाती चळवळींचे शिक्षण देणाऱ्या मुख्य कार्यालयाचे नाव आहे.)

हत्यारांचा, ती कोठून आली, याचा पत्ता लावण्याचे काम व्हेनेझुएलियन सैन्यावर सोपविण्यात आले. आणि त्या दृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्यात आले. हत्यारांवरील सर्व क्रमांक घासून टाकण्यात आले होते. रायफलच्या घोड्यावर एक भोक पाडण्यात आले होते. हेतू हा की, तो ओळखण्याचे साधन नाहीसे व्हावे. पण कोणाची ओळख दडविण्याचा हा प्रयत्न होता? बऱ्याच शस्त्रांवर बेल्जियम्मधील एका कारखान्याचे मार्क्स होते. पश्चिम युरोपमधील खाजगी मालकीचा हा बराच मोठा शस्त्रांचा कारखाना आहे. याने नुकतीच म्हणजे २३ मार्च १९५९ साली क्यूबन सरकारला २२,५०० अॅटोमॅटिक रायफली पुरविल्या होत्या. आणि मकामामध्ये सापडलेल्या शस्त्रांची त्या कारखान्याच्या तज्ज्ञांनी तपासणी करून असे सांगितले की, जो भाग काढून टाकला आहे तेथे कंपनीचा मार्क होता. आणि ती शस्त्रे क्यूबालाच पाठविलेली होती ३१ vsign 7 मशीनगन्ससुद्धा बेल्जियम कंपनीकडूनच क्यूबाने आणल्या होत्या. आणखी एक प्रयोग व्हेनेझुएलाच्या तज्ज्ञांनी त्या हत्यारावर केला. ज्या ठिकाणी घासलेले होते तेथे एक प्रकारचे औषधी मिश्रण लावले. आणि मग तो भाग मॅग्नीफाईंग ग्लासने तपासला. त्या वेळी क्यूबन सैन्याच्या खुणा त्यावर आढळून आल्या. आता पुराव्याची पूर्ण तयारी झाली होती आणि ही हकीकत जगासमोर आणण्यास हरकत नव्हती.

नाकारता न येण्यासारखा पुरावा.

व्हाईट हाऊसपासून चार रस्त्यांवर असलेल्या पॅन अमेरिकन युनियन बिल्डिंगमधील चौथ्या मजल्यावरील त्यांचे ऑफिस सदस्यांनी पूर्णपणे भरले होते. ही अमेरिकन राष्ट्र संघटनेची बैठक व्हेनेझुएलाने क्यूबाला आक्रमक ठरविण्यासाठी, तातडीची म्हणून, बोलावली होती. व्हेनेझुएलाचा वकील आपली बाजू मांडत होता: "व्हेनेझुएलाचे नागरिक हे कायम क्यूबाच्या कॅस्ट्रो राजवटीकडून अपमानीत होत आहेत. आणि आता अगदी ताजे आक्रमण झाले आहे. त्याचेबद्दल व्हेनेझुएलाजवळ भक्कम पुरावा आहे. आणि म्हणूनच व्हेनेझुएलाला ही बैठक बोलावण्याची विनंती करावी लागली."

या बैठकीला अर्जेंटिना, कोलंबिया, कोस्टारिका, युराग्वे आणि संयुक्त संस्थाने ही राष्ट्रे समासद असलेली एक चौकशी समिती दि. ८ डिसेंबरला पॅन अमेरिकन संघटनेने नेमली. ही चौकशी समिती लष्करी सल्लागार बरोबर घेऊन ताबडतोब कॅराकसला गेली. तेथे तिने सर्व पुरावे पाहिले. अनेकांच्या—संरक्षणमंत्री आदींसह—साक्षी घेतल्या.

व्हेनेझुएलाच्या लष्करी अधिकाऱ्यांनी निरनिराळ्या ठिकाणी हुडकून काढलेली, जप्त केलेली हत्यारे दाखविली व घातपाती चळवळीच्या, सरकार उलथून

[पान ६४ वर]

• समीर

# विचार वारे

## □ इंजिनियर-टेक्निशियन समन्वय आवश्यक

तांत्रिक ज्ञानाची निकडीची आवश्यकता असलेल्या हिंदुस्थानाला तंत्रज्ञ कोण व तंत्रज्ञानाचा प्रसार कसा करता येतो या दोन महत्त्वाच्या बाबतींत मार्गदर्शन करू शकणारे एक ब्रिटिश तज्ज्ञ नुकतेच दिल्लीला येऊन गेले. ते म्हणजे इंग्लंडातील 'इन्स्टिटयूशन ऑफ इलेक्ट्रिकल इंजिनियर्स' या संस्थेचे चिटणीस व स्वत: एक निष्णात इंजिनियर असलेले डॉ. जन्सबरो. सध्या अशिक्षित इंजिनियरांची जेवढी संख्या आहे तिला अनुरूप एवढे टेक्निशियन्स (तांत्रिक कामगार) तयार होत आहेत की नाहीत याची शंका आहे. प्रत्येक इंजिनियरच्या मागे साधारणपणे चार किंवा पाच टेक्निशियन लागतात. तांत्रिक साहायकांची एवढी संख्या उपलब्ध नसेल तर इंजिनियरचा दुरुपयोग होतो.

हिंदुस्थानात इंजिनियरच्या मानाने टेक्निशियन कमी प्रतीचा लेखला जात असावा असे दिसते. पण हे अनिष्ट आहे. कारण टेक्निशियनची जबाबदारी इंजिनियरइतकीच मोठी असते. आणि दोघांच्या अंगी निरनिराळ्या प्रकारचे कौशल्य लागते. टेक्निशियनचा व्यवसाय हा एक मानाचा व्यवसाय आहे व टेक्निशियन म्हणजे नापास झालेला इंजिनियर असे समजणे हे अत्यंत अनुचित ठरेल. तंत्रज्ञ कामगारांची व्यावसायिक संघटना स्थापन केल्यास त्यांना योग्य तो मान मिळू शकेल.

हल्ली तांत्रिक ज्ञान इतक्या झपाट्याने वाढत आहे की त्या त्या व्यवसायांतल्या तज्ज्ञांनादेखील उजळणीची आवश्यकता वाटते. इंजिनियरिंगच्या शास्त्रातही नवनवीन प्रगती होत असते. तिचे ज्ञान इंजिनियर मंडळींना व्हावे म्हणून 'इन्स्टिटयूशन ऑफ इलेक्ट्रिकल इंजिनियर्सतर्फे दोन महत्त्वाच्या गोष्टी करण्यात आल्या आहेत. त्यातली एक म्हणजे विशिष्ट विषयावर "सुटीतली शाळा" भरविणे. एखाद्या विश्वविद्यालयात एक किंवा दोन आठवडे जागा भाड्याने घेऊन ही शाळा भरविण्यात येते व निष्णात शास्त्रज्ञ, प्रोफेसर व इतर तज्ज्ञ मंडळी वर्ग चालवितात. दुसरा वर्ग म्हणजे अधिकारी व्यक्तींनी लिहिलेली शास्त्रीय पुस्तके छापणे. अशा पुस्तकांच्या छपाईची सोय केंब्रिज विश्वविद्यालयाच्या मदतीने करण्यात आली असून एक अत्यंत उपयुक्त पुस्तकमाला तयार करण्याचे काम चालू आहे. याच्या जोडीला तज्ज्ञांची चर्चा-मंडळे व त्यांच्यासाठी नियतकालिके हे मार्गही अवलंबिण्यात आले आहेत.

## □ लोकसंख्येच्या हालचालीचे अर्थशास्त्र

खेडेगावांतून शहराकडे जाणे व एका देशातून दुसऱ्या देशात राहायला जाणे, या दोन उद्देशांनी लोकसंख्येची फार मोठी हालचाल सारखी चालू असते. या हालचालीचे काय परिणाम होतात ? एक ब्रिटिश नगररचना-शास्त्रज्ञ व 'इन्स्टिटयूट ऑफ टाउन प्लॅनर्स' या भारतीय नगररचनाकार-संस्थेचे संस्थापक डॉ. कोनिग्जबर्गर हे नुकतेच दिल्लीला येऊन गेले. त्यांच्या मते लोकसंख्येचा आयात होणारा लोंढा सहन करणाऱ्या देशाला त्यापासून खूप लाभ होऊ शकतो. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकातली अमेरिका. या काळात अमेरिकेने युरोपहून येणाऱ्या लोकांचे स्वागत केले व त्याच काळात अमेरिकेत आर्थिक समृद्धीही खूप झाली. पहिल्या महायुद्धानंतर लोकसंख्येच्या आयातीवर कडक निर्बंध घालण्यात आले व त्याबरोबर आर्थिक परिस्थिती खालावत जाऊन अखेर १९२९ साली आर्थिक आणीबाणी चालू झाली. पश्चिम जर्मनीतही १९४६ नंतर जी आर्थिक सुबत्तेची जादू दिसून आली तिचा संबंध लोकसंख्येच्या आयातीला प्रोत्साहन देण्याच्या तेथल्या सरकारी धोरणाशी असलेला दिसून येतो. इस्रायलच्या बाबतीत तर हा परस्पर-संबंध ठळक रीतीने दिसतो. १९४८ सालापासून इस्रायलने सगळ्या जगातल्या यहुदी जनतेला तिकडे येऊन वसाहत करण्याचे आवाहन केले आहे. परिणामतः ओसाड वाळवंटाचे समृद्ध अशा उद्योगप्रधान राष्ट्रात त्याचे रूपांतर झाले आहे.

मग पाकिस्तान, ब्रह्मदेश व सिलोनमधून हिंदुस्थानात खूप निर्वासित आले आहेत, त्यांच्यामुळे हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे का ? उत्तर : आपखुषीने येणारा ('इमिग्रंट') व निर्वासित यांच्यांत फरक आहे. आपखुषीने येणारा माणूस स्वतःचे जीवन यशस्वी करण्यासाठी येतो.

खेड्यांतून शहरांकडे जो लोंढा वाहत असतो त्याचेही आर्थिक परिणाम होतात. ते म्हणजे : १. स्वस्त दराने मजुरी करणारी माणसे मिळतात. २. नवीन आलेल्या लोकसंख्येमुळे किरकोळ व्यापाराला तेजी येते. ३. भाडी वाढतात व घरमालकांचा फायदा होतो. ४. जागेची किमत वाढते. थोडक्यात म्हणजे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात व गरीब गरीबच राहतात; परंतु खेड्यांतून शहरांकडे येणाऱ्या या लोंढ्याचे नीट नियंत्रण केले व माणसांबरोबर भांडवलही आले तर या हालचालीचा फायदाही होऊ शकतो. खूप मोठ्या संख्येने येणाऱ्या लोकसंख्येचे स्वागत करण्याच्या तयारीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे चंडीगड. हिंदुस्थानासारख्या देशात अधिक चंडीगड हवीत. ●



बिहार वार्तापत्र
माणूस प्रतिनिधी

# विजय

पाटना स्टेशनसमोरील सिटी बस स्टँडवर ऊन तापू लागलें होते. एक-दोन बसेस अस्ताव्यस्तपणे उभ्या होत्या. आजूबाजूला बाजार भरल्याप्रमाणे गर्दी दाटली होती. पलीकडच्या बाकड्यावर सिटी बस सर्व्हिसचे काही नोकर वाटणारे गप्पा मारीत बसले होते.

" जी—सेक्रेटरीएट जानेवाली बस कौनसी है जी ? "

" उन साबसे पूछिये. "

त्या साहेबाला मी विचारलं. त्याचंही हेच उत्तर, " उन साबसे पूछिये. " तीन-चारदा हीच संथा मिळाल्यावर जवळच उभ्या असलेल्या एका विद्यार्थ्याला मी विचारलं. त्यावर तोंडातील पान पचकन् थुंकून तो म्हणाला, " देखी ना साब हमारी बस सर्व्हिस ? सालोंको जला देना चाहिये. "

५

# सोसण्याची तयारी आहे कां ?

एवढयात कुठून तरी एक बस आली. अनेक मुंग्या दाण्याला तोंडात धरून नेतात तसे दिसत होते. बसच्या सर्व बाजूंनी माणसे चिकटली होती. पटन्याची सर्व कॉलेजेस तीन महिन्यांच्या बंदीनंतर प्रथमच खुली झाली होती. त्यामुळे कॉलेजमध्ये जायला अधीर झालेल्या मुलांचे घोळके स्टॅन्डवर केव्हापासून ताटकळत उभे होते. बस पाहताच ते धावले. बसमधली जागा संपली तेव्हा ते बसच्या सर्व बाजूंनी चिकटले. वीस-पंचवीस विद्यार्थी टपावर चढले. कंडक्टर ओरडून त्यांना अर्वाच्य शिव्या देऊ लागला, तेव्हा तीन--चार विद्यार्थी त्याच्याशी गुद्दागुद्दी करायला धावले. तेवढ्यात जवळच उभा असलेला एक प्रौढ गृहस्थ ओरडून म्हणाला, "अरे, आता तर कॉंग्रेसचं राज्य गेलं आहे ना? महामायाबाबूंच्या राज्यातही तुम्ही असाच दंगा करणार ?"

हे ऐकताच मुलं एकदम गप्प झाली. कंडक्टरचा शर्ट धरलेल्या एका दाढीवाल्या मुलाने मूठ वळवलेला हात उंच करून 'महामायाबाबू जिंदाबाद' अशी हसत आरोळी ठोकली आणि आपली पुस्तके सांभाळीत तो टपावर उडी मारून चढला. बस सुरू झाली.

बिहारच्या वऱ्याच सामाजिक आणि राजकीय समस्यांचे मर्म या छोटयाशा घटनेत गवसल्यासारखे मला वाटले. भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि कमालीची अकार्यक्षमता यांमुळे बिहार कांग्रेसची राजवट पोखरून निघाली होती. असंतुष्ट विद्यार्थ्यांना आपला राग प्रकट करायला निमित्त मात्र पुरे होत होते. त्यामुळेच

बिहारातील विद्यार्थ्यांच्या दंगली गतवर्षी गाजल्या. गोळीबार झाले आणि बिहार-मधील चारही विद्यापीठे (पटना विद्यापीठ, रांची विद्यापीठ, मुजफ्फरपूरचे बिहार विद्यापीठ आणि गयेचे मगध विद्यापीठ) महिनेन् महिने बंद ठेवावी लागली होती. जनतेला आणि विद्यार्थ्यांना उपदेशाचा डोस पाजणाऱ्या मंत्र्यांची अनैतिक वागणूक लोकांना उघड दिसत होती.

"खरे म्हणजे भ्रष्टाचारालाही हरकत नाही. काँग्रेसच्या साऱ्याच राज्यांतून भ्रष्टाचाराच्या वार्ता येतात," एक डॉक्टर माझ्याशी बोलताना म्हणाले. "पण त्यालाही काही मर्यादा पाळाव्या लागतात. पंजाबचा कैरों कसा उमदा माणूस होता! भ्रष्टाचारी होता, पण त्याने पंजाबची कशी प्रगती केली. 'मीही खाईन आणि सारा पंजाबही खाईल,' अशी त्याची वृत्ती होती; पण बिहारातील काँग्रेस मंत्री मात्र 'फक्त आम्हीच खाऊ, साऱ्या बिहारने उपाशी मरावे,' असे म्हणत होते!"

"बिहार सरकार इतक्या खालच्या पातळीला पोचलं होतं की, आता त्याच यापेक्षा अधिक अध:पात होणं शक्य नव्हतं. शंभर घटका भरल्या होत्या," एका प्राध्यापकानं मला सांगितलं.

## नैसर्गिक समृद्धी : सामाजिक दारिद्र्य

बिहार खरे म्हणजे काँग्रेसचा 'गढ' (बालेकिल्ला). पण या निवडणुकीत बिहारी जनतेने जणू कट करून काँग्रेसला उखडून लावले. आपण एवढे करू शकू, याची बिहारी जनतेला खात्री नव्हती! आता नवे विरोधी मंत्रिमंडळ अधिकारावर आले आहे. आणि प्रथमच प्रसूत झालेल्या मातेने आपल्या नवजात अपत्याकडे कुतूहलपूर्ण आश्चर्याने पाहावे, तशी बिहारी जनता आपल्या या कर्तृत्वाकडे पाहत आहे! सध्या बिहारातील शहरांमध्ये चर्चेला अक्षरश: दुसरा विषय नाही. दुष्काळाचा विषय पुसटपणेही चर्चेला येत नाही. कचेऱ्यांमध्ये, सेक्रेटरीएटमध्ये, दुकानांत बाजारात, रेल्वेमध्ये, रस्त्यांवर एकच चर्चा चालते. आणि बिहारच्या राजकीय अंत:प्रवाहाची सामान्य बिहारी जनतेला खूपच माहिती असल्यासारखी दिसते. लोक इतकी चर्चा करतात की, ऐकणाऱ्या तिऱ्हाइताला त्याचा कंटाळा यावा. काँग्रेसचा पराभव, नवे मंत्रिमंडळ आणि पराभूत काँग्रेसमध्ये अजूनही चालू असलेल्या मारा-माऱ्या यांवर लोक सारखे रसभरीतपणे बोलत असतात.

पटन्यामध्ये आणि आजूबाजूच्या गावांमध्ये मी अनेकांना भेटलो. उच्च सरकारी अधिकारी, पत्रकार, विद्यार्थी, प्राध्यापक, समाजशास्त्रज्ञ, रिक्शावाले, डॉक्टर या साऱ्यांच्या बोलण्यांतून एकच सूर दिसत होता. सर्वांनाच काँग्रेस असह्य झाली होती. काँग्रेसला सत्ताभ्रष्ट करणे, हे एकच ध्येय लोकांपुढे होते. दुसऱ्या कोणत्याही विरोधी पक्षाचे सोयर सुतक लोकांना नव्हते. खरोखरच काँग्रेस गेली म्हणजे झाले. आणि काँग्रेस जेव्हा गेली, तेव्हा आतापर्यंत दाबून ठेवलेला आपला आवेग सरकारी अधिकारीही उघडपणे व्यक्त करू लागले. मी सचि-

वालयात गेलो तेव्हा जिथे तिथ काँग्रेसच्या आणि मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची हीच चर्चा चालू होती. कोणत्या मंत्र्याने किती वर्षांत किती इस्टेट केली, याचे किस्से सांगितले जात होते. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये नव्या मंत्रिमंडळाविषयी एक प्रकारची अनामिक भीतीही जाणवत होती. त्याचबरोबर आता नवे सरकार आले आहे किंवा आपण आणले आहे; ते काही तरी करील, राज्यातील सावळा गोंधळ संपुष्टात आणील, अशी आशाही लोकांना वाटते आहे! पण विरोधी पक्षांचे कडबोळे शेवटपर्यंत टिकेल ना, अशी धाकधूकही आहे.

गेली वीस वर्षे सत्तेच्या राजकारणापुढे बिहारची प्रगती दुर्लक्षित राहिली आहे. नैसर्गिकदृष्ट्या बिहार हे अतिशय श्रीमंत राज्य आहे. गंगेकाठची अतिशय समृद्ध जमीन आणि भरपूर खनिज संपत्ती. भारतातील अर्ध्यावर खनिजे दक्षिण बिहारच्या रांचीच्या आसपासच्या खाणींमधून निघतात; परंतु तरीही बिहार हे अत्यंत गरीब राज्य आहे. बिहारचे दरडोई उत्पन्न भारतात सर्वांत कमी आहे. जमिनीकड होत असलेल्या दुर्लक्षामुळे दर एकरी उत्पन्नही फार कमी आहे. काही काही ठिकाणी तर दर एकरी पाच-सहा मण भात निघतो. नैसर्गिक समृद्धीच्या पार्श्वभूमीवर बिहारचे हे दारिद्र्य विशेषच उठून दिसते आणि अनेकांना घोटाळ्यात पाडते! 'बिहारची नैसर्गिक समृद्धी आणि बिहारी लोकांचे दारिद्र्य' हा पटना विद्यापीठातील एका संशोधकाने डॉक्टरेटसाठी घेतलेला विषय आहे. श्री. महाराजा—या विषयाचे संशोधक—मला म्हणाले, "गेली दोन वर्षे मी यासाठी खपतो आहे, पण मला नेमकी उत्तरे अद्याप सापडली नाहीत."

आर्थिक दारिद्र्य आणि शासकीय अकार्यक्षमता हे बिहारचे शाप आहेत. पटना शहरातील सर्व कामे अत्यंत संथपणे, फावल्या वेळात चालावीत तशी चालताना दिसतात. बस सर्व्हिस म्हणा, रेल्वे म्हणा, दुकाने म्हणा, सरकारी कचेऱ्या, सेक्रेटरीएट या सर्व ठिकाणी कामे रेंगाळत, मोंगली थाटात चालतात. माझा बिहार सेक्रेटरीएटमधला अनुभव तर मजेशीर आहे. एवढी लाल फीत कुठे पाहिली नव्हती! जिथे जावे तिथे लोक मोकळेपणाने तंबाखू चोळत राजकारणावर गप्पा मारताना दिसत होते. दुसऱ्या अधिकाऱ्यांची उघड निंदा करीत होते. कामाचा प्रश्न काढला की, 'बगलके कमरेमें ज़ाव. वो साब सब बता देंगे.' हे उत्तर! सर्व 'बगल'च्या खोल्यांमधून मी फिरून पुन्हा प्रथम गेलो, त्याच खोलीशी आलो तेव्हा तिथल्या साबला माझी कींव आली. शेवटी चहा पाजून त्याने माझी बोळवण केली. काम गेले उद्यावर!

ही माझी तक्रार नाही. पटन्यातल्या बुद्धिजीवी वर्गात या प्रकाराविषयी अत्यंत तीव्र नापसंती आहे. "काल सेक्रेटरीएटमध्ये गेलो होतो," असे मी एका प्राध्यापकाला सांगताच त्याने चटकन विचारले, "कितने कमरे घूमकर आये?"

'साब' हे पटन्यातील फार बडे प्रस्थ आहे. प्रत्येकाने प्रत्येकाला 'साब' हा

प्रत्यय लावला पाहिज. मी पटन्यात बऱ्याच बड्या बड्या लोकांना फोन केले. "जी साब, तो आप ऐसा करीए ना साब..." वगैरे त्यांचे बोलणे ऐकून मला कसेसेच वाटत होते. एका खाजगी ऑफिसमध्ये मी बसलो होतो. ऑफिसरचे नाव होते सिन्हा. काही कामानिमित्त सिन्हासाहेबांनी आपल्या एका कारकुनाला कुठे तरी फोन जोडून द्यायला सांगितले. कारकून नवीन असावा. तो पलीकडच्या पार्टीला "सिन्हा आपल्याशी बोलताहेत सिन्हांना बोलायचं आहे,–" असं सारखं सांगत होता. फोन काही बरोबर लागत नव्हता. इकडे सिन्हासाहेबांचं कामाकडं लक्ष नव्हतं. त्यांच्या कपाळावर आठ्या चढल्या होत्या. शेवटी ते ओरडले, "हे सिन्हा सिन्हा काय करतो आहेस ? सिन्हा साब म्हणता येत नाही ?"

एका सार्वजनिक संस्थेच्या जबाबदारीच्या पदाधिकाऱ्याच्या कचेरीत गेलो. त्या संस्थेच्या कामाच्या बिहारमधील वाहतुकीची व्यवस्था त्या पदाधिकाऱ्याकडे होती. तो नव्याने पदाधिकारी झाला होता की काय कुणास ठाऊक ! पण घडलेली गोष्ट अगदी शंभर टक्के खरी आहे. साहेबांच्या टेबलावर बिहार राज्याचा नकाशा होता. बिहार राज्याचा वेगळा नकाशा मी प्रथमच पाहिला असल्याने मला त्याविषयी कुतूहल होते. काचेखाली असलेला तो नकाशा माझ्या बाजूने उलटा होता. म्हणून मी त्याला विचारलं, "यात पटना कुठे आहे ?" आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे नकाशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत साहेब पटना धुंडण्यासाठी बोट फिरवू लागले. शेवटी मीच, उलटच्या बाजूने पटन्यावर बोट ठेवले तेव्हा साहेबांचा चेहरा पडला.

यात काडीचीही अतिशयोक्ती नाही ! बिहारी माणसाला ही गोष्ट सांगितली तर त्यात त्याला अतिशयोक्तीचा संशयही येत नाही आणि आश्चर्यही वाटत नाही. "असे कितीतरी अन्य सरकारी अधिकारी तुम्हांला जागोजागी आढळतील," एका पत्रकाराने मला सांगितले. हा अमक्या मंत्र्याचा नातेवाईक, तो तमक्याच्या वशिला लावून आला, असे सर्वत्र आढळते. सगळ्याच राज्यांत या गोष्टी आढळतात. पण बिहारात वशिले लावताना पात्रतेची विशेष शहानिशा होत नसावी ! ज्या सार्वजनिक संस्थेच्या पदाधिकाऱ्याची गोष्ट सांगितली तिथे वशिल्याचा प्रश्नच नव्हता. एक उदाहरण म्हणून मी ती गोष्ट सांगितली.

ही अनीती, हा दंभ, पोकळपणा, जसा बुद्धिजीवी वर्गाला असह्य झाला होता, त्याचप्रमाणे श्रमजीवी वर्गालाही पिळवणूक असह्य होत होती ! इथले शेतकरी, मजूर, रिक्षावाले, हॉटेलांतील वेटर सारे दबलेले. पैसा कमी मिळतो आणि असंतोष उघड प्रकट करायची सोय नाही. पटन्यातले रिक्षावाले "जाना है हजूर ?" म्हणून अदबीने विचारू लागले, की मुंबईच्या टॅक्सीवाल्यांची आणि नागपूरच्या रिक्षावाल्यांची आठवण होऊन कसेसेच वाटते. रिक्षावाल्याला चार-चार मैल ताबडवून लोक त्याच्या हातावर आठ–दहा आणे टिकवतात. पटन्याच्या हॉटेलातील

गरीब नजरेचे दरिद्री वेटर्स जरा प्रेमाने अधिक बडदास्त ठेवू लागले, की पुण्या-मुंबईच्या वेटर्सची आठवण होऊन संशय वाटू लागतो.

श्रमजीवी वर्गाला मानही नाही. नेहमी त्यांच्यावर सारखे खेकसून ओरडले जाते. उत्तर भारतात साधारणत: सर्वत्र श्रमजीवी वर्गाची परिस्थिती अशीच आहे; परंतु पटन्याच्या एका वृत्तपत्रांत जनतेचे कोणकोणते साचलेले असंतोष निवडणुकीच्या निमित्ताने वर उफाळून आले, त्याचे विश्लेषण केले होते. त्यात त्यांचाही समावेश होता. कोणत्याही अन्यायाचे कारण काँग्रेसची भ्रष्टाचारी राजवट असेच शेवटी शेवटी बिहारात मानले जाऊ लागले होते; आणि या असंतोषाचा स्फोट इतक्या विलक्षण रीतीने झाला की, सर्वांनाच अनपेक्षित धक्का बसला.

## असंतुष्ट विद्यार्थी : भ्रष्ट नोकरशाही

" बिहारात विद्यार्थ्यांचे असे काही खास वेगळे प्रश्न नाहीत. बिहारातील विद्यार्थ्यांची बेशिस्त म्हणजे बिहारच्या राजकारणाचे प्रतिबिंब होते. " पटन्याच्या 'सिन्हा-इन्स्टिटयूट ऑफ सोशल स्टडीज 'चे संचालक डॉ. डी. के. दासगुप्ता माझ्याशी बोलताना म्हणाले. " विद्यार्थ्यांमधला राजवटीविषयीचा असंतोष इतका वाढला होता की, तो दंगलीच्या स्वरूपात प्रकट व्हायला कोणतेही क्षुल्लक कारण पुरत होते. विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे विद्यार्थ्यांमध्ये शोधण्यापेक्षा बाहेर शोधली पाहिजेत आता सरकार बदलले आहे. आणि माझा असा तर्क आहे की, यापुढे बिहारी विद्यार्थ्यांची दंगेखोर प्रवृत्ती एकदम थंड होईल."

हे तरुण असंतुष्ट विद्यार्थीही मोठ्या संख्येने मतदार होते.

बिहार काँग्रेसमधील जातीयता तर सुप्रसिद्धच आहे. मुख्यमंत्री सहाय हे कायस्थ तर बिहार काँग्रेसचे एक आवडते पुढारी श्री. बिनोदानंद झा हे मैथिली ब्राह्मण. काँग्रेस संघटनेमध्ये त्यांचे आपापल्या जातीचे गट तयार आहेत; त्याचबरोबर भूमिहार ब्राह्मण, महाजन असे अनेक गट काँग्रेसमध्ये आहेत. या जातीयतेमुळे, गटबाजीमुळे आणि अंतर्गत भांडणांमुळे बिहारी काँग्रेस आतून पूर्ण पोखरली गेली आहे ! काँग्रेसची अंतर्गत भांडणे एवढी तीव्र आहेत की, या निवडणुकीत एवढा जबरदस्त पराभव झाला तरी नव्या विधानसभा काँग्रेस पक्षाचा नेता निवडण्याच्या बाबतीत झालेल्या भांडणांमुळे सारे बिहार गाजले. विरोधी बाजूला असताना नेतृत्वासाठी ही भांडणे तर सत्तेवर किती होत असतील !

हे सारे दुर्गुण, भ्रष्टाचार, दंभ, पोकळपणा, अकार्यक्षमता, जातीयता, सारे काही मंत्रिमंडळाच्या वरच्या थरापासून सरकारी नोकरशाहीच्या खालच्या पातळीपर्यंत झिरपत होते ! वर हे प्रकार चालू असताना मग खाली कोण कुणाला विचारणार ? या संदर्भात मला कै. स. गो. बर्वे यांनी सांगितलेले उदाहरण आठवते. भ्रष्टाचाराच्या बाबतीत 'माणूस 'ला दिलेल्या मुलाखतीत कै. बर्वे म्हणाले होते, " सरकारी यंत्रणा ही एखाद्या तंतुवाद्यासारखी असते. वरच्या खुंटया ढिल्या असल्या की

वाद्य बेसूर असते. खुंटचा नुसत्या पिळण्याचा अवकाश, की वाद्य सुरावर येते."

बिहारमधल्या राजवटीच्या साऱ्या खुंट्या ढिल्या पडल्या होत्या आणि वाद्य बेसूर झाले होते. सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारी साधीसुधी कामे सहजासहजी होत नव्हती. प्रत्येक गोष्टीसाठी अनेक जणांचे हात ओले करावे लागत होते. लाच घेणे आणि लाच देणे ही बिहारात सामान्य गोष्ट झाली होती. लोक कंटाळले होते. काँग्रेस सरकार नको. दुसरे कोणतेही सरकार आले तरी चालेल, अशी लोकांची वृत्ती झाली होती. लोक उघड उघड मंत्र्यांना शिव्या देऊ लागले होते.

त्यामुळे काँग्रेसचा भ्रष्टाचार हेच विरोधी पक्षांच्या निवडणूक-प्रचाराचे मुख्य सूत्र होते. प्रचारामध्ये विरोधी पक्षांचा सूर अत्यंत आक्रमक होता. मी पटन्यात आलो, तेव्हा निवडणुकांचे निकाल जाहीर होत होते. पटन्यातील निवडणूक पोस्टर्स ताजी होती. एवढी भडक निवडणूक पोस्टर्स प्रथमच पाहिली. भ्रष्टाचारी काँग्रेसी मंत्री पैशाच्या थैलीवर बसून विद्यार्थ्यांवर बंदुकीच्या गोळ्या झाडताहेत, बिहारी शेतकऱ्याच्या पाठीत खंजीर खुपसताहेत, अशी आणि या तऱ्हेची दृश्ये दाखविणारी विरोधी पक्षांची पोस्टर्स दिसत होती. हीच पोस्टर्स खेड्यापाड्यांतही दिसत होती. 'तुमच्या मुलांना बंदुकीच्या गोळ्यांपासून वाचवायचे असेल तर काँग्रेसला मत देऊ नका,' अशा तऱ्हेच्या घोषणा शहरांच्या आणि खेड्यांच्या भिंतींवर दिसत होत्या.

त्यामुळे जनतेने निवडणुकीमध्ये विरोधी पक्षांना भरभरून मते दिली. काँग्रेसला विजयाचा आत्मविश्वास होता; पण विधानसभेच्या ३१८ जागांपैकी अवघ्या १२८ जागा काँग्रेसला मिळाल्या. या अकस्मात झालेल्या पराभवामुळे काँग्रेसला जसा धक्का बसला, तसेच विरोधी पक्षदेखील चकित झाले. साऱ्या विरोधी पक्षांचे विधानसभेतील बळ अनपेक्षित प्रमाणात वाढले. सं. सो. पा. आणि जनसंघ यांचे बळ तर तिपटी–चौपटीने वाढले. विरोधी पक्षांनी स्वप्नातही यशाची एवढी आशा धरली नव्हती!

## विरोधी मंत्रिमंडळाकडून अपेक्षा

आता विरोधी सरकार सत्तेवर आले. त्याचे बिहारी जनतेने मोठ्या अभिमानाने स्वागत केले. जिकडे तिकडे, "अरे भाई, आता आपलंच राज्य आहे ना!" असं जो तो सांगताना दिसतो. वर्तमानपत्रांमधील पत्रव्यवहारांमधून रकानेच्या रकाने भरून 'जनतेच्या सरकारबद्दल आमच्या अपेक्षा' सांगणारी पत्रे छापली जातात. नव्या संयुक्त सरकारचे मुख्यमंत्री श्री. महामायाबाबू प्रसाद ह एक अतिशय लोकप्रिय नेते आहेत. महामायाबाबूंची देवाप्रमाणे स्तुती करणारी एकेक कविता येथील एक प्रतिष्ठित इंग्रजी पत्र रोज छापते.

जनतेच्या अपेक्षा फार उंचावल्या आहेत. आता आपले सरकार आले. साऱ्या अडचणी भराभर संपतील, प्रश्न सुटतील, भ्रष्टाचार संपेल, असे लोकांना वाटू

लागले आहे. अपेक्षेप्रमाणे नव्या सरकारने कारभारयंत्रणेला गती देण्यास मोठ्या तडफेने सुरुवात केली आहे.

## अवघड आणि प्रचंड

परंतु नव्या सरकारपुढील प्रश्न फार आहेत. दुष्काळाचे अक्राळ–विक्राळ भूत बिहारच्या मानगुटीवर बसले आहे ! अकार्यक्षम यंत्रणा आहे, विद्यार्थ्यांना हाताळायचे आहे. प्रश्नांचा अवघडपणा पाहूनच अपक्षीय आणि इतर उमेदवारांना फितवून सरकार स्थापण्याच्या फंदात या वेळी काँग्रेस पक्ष पडला नसावा ! आणि या प्रश्नांना तोंड द्यायचे आहे अनेक पक्षांचे कडबोळे तयार होऊन झालेल्या संयुक्त सरकारला ! या संयुक्त सरकारातील पक्षांची एकी टिकेल की नाही, याची लोकांना आणि खुद्द त्या पक्षांनाही धाकधूक आहे. त्याचबरोबर हा कसोटीचा काळ असल्याचीही त्यांना जाणीव आहे. त्यामुळे सारेच पक्ष जपून पावले टाकीत आहेत.

केरळ, ओरिसा, बंगाल आदी ज्या ज्या इतर राज्यांमध्ये विरोधी पक्षांची संयुक्त सरकारे सत्तेवर आली तेथे ती येणार, याची थोडीफार तरी अपेक्षा होती. बिहार-मध्ये संयुक्त सरकार आले ते मात्र अगदी अनपेक्षित रीतीने ! विजय सोसण्याची विरोधी पक्षांची पूर्वतयारी नव्हती, त्यामुळे आता यापुढे संयुक्त सरकारला प्रत्येक प्रश्नावर निर्णय घेण्यात सर्व पक्षांची पुन:पुन्हा संमती घ्यावी लागणार आहे. परिस्थिती अधिकच नाजूक आहे.

" १९४७ साली स्वतंत्र भारतात काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यावर भारतात सगळीकडे जशी निराशाजनक स्थिती होती, तशीच सध्या बिहारमध्ये आहे. तेव्हा प्रश्न सोडविण्यात काँग्रेस अयशस्वी झाली असली तरी तिला सत्तेवरून खाली खेचणारा दुसरा पक्ष नव्हता. इथे बिहारमध्ये मात्र काँग्रेस टपून बसली आहे. संयुक्त मंत्रिमंडळाचे कोठे चुकते, कोठे ठिणग्या पडतात याचीच फक्त काँग्रेस नेते वाट पाहत आहेत, " सं. सो. पा. चा एक कार्यकर्ता मला म्हणाला, " पुढचा काही काळ बिहारमध्ये राजकीयदृष्टचा मोठा आणीबाणीचा आहे. संयुक्त सरकार यशस्वी झाले नाही तर लोक पुन्हा निराश बनतील आणि राज्य पुन्हा अस्थिरतेच्या, हिंसेच्या गर्तेत हेलकावे खात राहील ! "

● ●

## स मा प्त

**[ लवकरच सुरू होत आहेत : आसामची वार्तापत्रे ]**

# एका दवाखान्याची गोष्ट

## सुरेश गायकवाड

निसर्गाने बहरलेला, नटलेला जिल्हा म्हणजे आमचा कोल्हापूर जिल्हा. त्याच्या ह्या निसर्गसौंदर्यात शासनाने व्यावहारिक अशी उपयुक्त भर घातली नाही. आपसातील गटबाजीमुळे ह्या जिल्ह्याकडे त्याने संपूर्ण दुर्लक्षच केले; आणि कलावंतांचे आगर व राजकीय पुढाऱ्यांची कर्मभूमी असलेली ही कलानगरी शासनाच्या दुर्लक्षाने उपेक्षित ठरली !

ह्या जिल्ह्यातील शेतकरी कष्टाळू आहे, संधी मिळाली तर तो सोनंही पिकवील. कोणत्याही क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या ह्या जिल्ह्यात शासनाने लोकोपयोगी अशा सोयी केल्याच नाहीत. ह्या जिल्ह्यात खनिज संपत्ती भरपूर आहे; तिचा उपयोग केला तर देशालाही मोठा फायदा होईल, आणि त्याबरोबर बेकार आणि मुंबईकडे धाव घेणाऱ्या तरुणांना आपली शेती सांभाळून रोजगारही करता येण्यासारखे आहे. आजऱ्याजवळील रामतीर्थावरील धरणाची हीच अवस्था आहे. प्लॅन्स तयार होते, पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होत नाही; कारण प्रमुख पुढाऱ्यांची गावे–जमीन धरणाखाली जाते. अशा अनेक कथांची गुंफण ह्या जिल्ह्यात गुंफली जात आहे. त्यांपैकीच एक करुण कथा महागोंड या गावाची. साधीभोळी, रांगडी माणसं त्यांचं दुःख कथन करीत आहेत.

आमचे महागोंड गाव कोल्हापूरपासून जवळ जवळ तीस मैल अंतरावर आहे. तालुक्याचे गाव–आजरा– साधारणत: सहा मैल अंतरावर आहे. गावात मोटारी-सारखे वाहन जाऊच शकत नव्हते; कारण योग्य रस्ताच नव्हता ! लोकांनी ती उणीव आपल्या श्रमदानाने भरून काढून उत्तम रस्ताही केला आहे. गाव निसर्गाने नटलेले आहे. पांडवांनी बांधलेली अनेक देवालये गावाची दैवते आहेत. गावात श्री बाळोबाचे प्रमुख देवालय गावाच्याबाहेर उंचावर विराजमान झाले आहे. गावातील बहुतेक लोक अशिक्षित आहेत. गावाची लोकसंख्या जवळ जवळ दोन ते अडीच हजार आहे. मौजे महागोंड गाव ग्रूप ग्रामपंचायतीचे प्रमुख केंद्र आहे. गावाभोवती जवळ जवळ वीस ते पंचवीस गावे थोडया थोडया अंतरावर वसलेली आहेत. गावातील मुंबईला गेलेल्या तरुणांनी एकत्र येऊन संघटना स्थापन केली आहे. त्यांनी आपले नेतृत्व आपल्या गावचे सुशिक्षित, प्रामाणिक, कष्टाळू तरुण श्री. मारुतीराव गायकवाड ह्यांच्यावर सोपविले आहे. त्यांनी गावात कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ह्यांकडे लक्ष वेधले आहे.

गावात शाळा नव्हती, त्यामुळे ती जुन्या चावडीत भरत असे. शिकणारी मुले बरीच होती. त्या करिता त्यांनी प्रथम गावात शाळा बांधण्याचा संकल्प केला आणि गावाच्या वाटयाला आलेला आर्थिक वाटा सरकारात भरला गेला. लोकल बोर्डाने ताबडतोब मान्यता दिली. शाळा बांधली गेली. गावाबाहेर असलेली शाळेची इमारत गावकऱ्यांच्या श्रमाचे, सहकाराचे प्रतीक आहे. त्यानंतर गावात पोस्ट आले; ग्रामपंचायतीसाठी टुमदार ऑफिसही बांधले गेले. गावात पाण्याची चांगली सोय नव्हती, त्यामुळे अनेक गैरसोयी निर्माण झाल्या होत्या ! ह्या गोष्टीकडे लक्ष केंद्रित करून पाण्याच्या अनेक अडचणी दूर केल्या गेल्या. गावाचा होत असलेला पालट पाहून अनेक गावांनी आमचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. ग्राम विकासाचे बीजारोपण आम्ही केले, असेच आता आम्हांला अभिमानाने म्हणावेसे वाटते.

पण सर्व गोष्टी झाल्या तरी आजारी झालेल्या माणसाला औषधपाणी मिळण्याची सोय तालुक्याशिवाय अन्य कोठेही नाही ! अत्यंत आजारी असलेला माणूस किंवा बाळंतपणात अडलेली स्त्री ह्यांची व्यवस्था त्वरेने करणे अशक्य होते. त्यांना तालुक्याला नेईपर्यंत त्यांच्या जिवाची शाश्वती धरणे अशक्य होते. शेतात काम करीत असताना मार लागल्यामुळे औषधाअभावी धनुर्वातासारख्या रोगाला अनेकांना बळी पडावे लागत आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्यात येऊन गावाला व आजूबाजूच्या खेडयांना वैद्यकीय मदत गावातल्या गावात मिळण्याची सोय व्हावी, ह्या दृष्टीने श्री. गायकवाड यांनी पुढाकार घेऊन प्रयत्न सुरू केले.

गावात ठराव करून ग्राम पंचायतीकडे पाठविण्यात आला, पण उत्तरच आले नाही. आमचा ठराव तालुका पंचायत समितीने फेटाळला. त्याचे कारण स्वार्थ. जे जे सभासद तालुका पंचायत समितीवर निवडून आले होते, त्यांनी त्यांनी आपल्या गावांना

प्रायमरी हेल्थ सेंटर, सब सेंटर इत्यादी वाटून घेतले. तालुका पंचायतीच्या चेअर-मननी तर आम्हांला मिळणारे हेल्थ सेंटर आपल्या गावाला मंजूर करून घेतले आणि सरळ आम्हांला 'न'चा पाढा दाखविला. आमच्या गावात येऊन अनेक वेळा ह्या व्यक्तीने सांगितले की, " तुमच्या गावाला आयोडियनची साधी बाटलीसुद्धा मिळणार नाही, तर दवाखाना कुठला मिळणार ! "

## दवाखान्याची प्रचार मोहीम

आम्ही पुढील कार्यास जोराने सुरुवात केली. आम्ही मुंबईहून काही लोक गावी रवाना झालो. आजूबाजूच्या खेड्यांत प्रचाराची मोहीम सुरू केली. प्रत्येक खेड्यात जावे, तेथील लोकांना जमवावे. मौजे महागोंडला दवाखाना झाला तर आपल्याला काय फायदा होईल हे पटवून द्यावे, त्या लोकांच्या सह्या घ्याव्या, असा दिनक्रम आम्ही सुरू केला. उन्हातान्हाची आम्ही तमा बाळगली नाही. भूक लागली असता रानातले काजू, आंबे खावे आणि पुढची मजल गाठावी. लोकांना आमचे म्हणणे पटत होते. अनेक पाने सह्यांनी भरली गेली.

ह्यानंतर आम्ही जिल्हा परिषदेकडे धाव घेतली; पण तेथेसुद्धा आम्हांला कटू अनुभव मिळाले. आमचे मारुतीराव अनेक वेळा सुटी घेऊन खास ह्या कामाकरिता कोल्हापूरला जिल्हा परिषदेकडे जात. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, आरोग्य खात्याचे चेअरमन आणि मुख्य कार्याधिकारी ह्यांना आम्ही सतत तीन वर्षे भेटत आलो आहोत. ही मंडळी निवडून येण्यापूर्वी म्हणत असत, की आम्ही निवडून आल्यानंतर गरिबांच्या खोपटाखोपटांतून जाऊ, त्यांचे दुःख दूर करण्याचे प्रयत्न करू ! पण ह्यांनी आम्हांला सहकार्य देण्याऐवजी हेटाळणी केली. आमची पदोपदी निराशा केली

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री आबासाहेब खेडकर ह्यांच्याकडे आजपर्यंत प्रयत्न करीत आलो आहोत. अनेक वेळा सचिवालयात, निवासस्थानी त्यांना भेटून आमची मागणी त्यांना कथन केली आहे. अनेक वेळा त्यांनी जिल्हा परिषदेशी ह्या गोष्टीकरिता संपर्क साधला आहे. जेव्हा जेव्हा ते दौऱ्यावर जातील तेव्हा तेव्हा न विसरता ह्या प्रश्नाला जिव्हाळ्याचा प्रश्न समजून त्यांनी तो जिल्हा परिषदेपुढे मांडला आहे. दवाखाना लवकर सुरू करा म्हणून सांगत, पण ते गेले की तापलेले वातावरण शांत होई.

## मुंबई आणि दिल्लीही

दि. ९-१-१९६५ रोजी नामदार खेडकरांचा दौरा आमच्या भागात होता. म्हणून आम्ही ताबडतोब गावी गेलो. आजूबाजूच्या गावांच्या लोकांनाही बोलावून सर्वांच्या सभा घेतल्या. लोक म्हणत होते, " मारुतीराव, आपण म्हणाल ते करण्यास आम्ही तयार आहोत; पण आम्हांला दवाखान्याची सोय झाली पाहिजेच ! " सर्वानु-मते असे ठरले की, सर्व गावांचा मोर्चा काढून आबासाहेब खेडकरांना जाहीर निवेदन द्यावयाचे. सारे गावकरी आपल्या बायका-मुलांसह नामदार खेडकरांना भेट-

ण्यास तालुक्याला निघाले. सूर्योदयाचा समय होता. पहाटेच्या गार वाऱ्यातून रानावनांतून चाललो होतो. साऱ्यांना एकत्र गुंफण्याचे सामर्थ्य ज्यांच्या हातात होते ते मारुतीराव आणि त्यांचे साथीदार विठोबा वालकर, शेळपे आणि गावातील मंडळी अग्रभागी विचारविनिमय करीत चालली होती. मोर्चा तालुक्याला पोहोचला. आबासाहेबांनी लोकांचे गाऱ्हाणे ऐकले. त्यांनी ताबडतोब सदस्यांची मिटिंग घेऊन महागोंडला दवाखाना मंजूर केला. दवाखाना मंजूर झाला असे आबासाहेबांनी सांगताक्षणी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. गावकऱ्याचा ऊर आनंदाने भरून आला.

पण दवाखाना चालू होईल, अशी दररोज वाट पाहता पाहता काळ केव्हाच निघून गेला; पण कागदावरचा दवाखाना जमिनीवर उभा राहिला नाही ! पुन्हा आबासाहेब, तालुका पंचायत, जिल्हा परिषद ह्यांच्याशी पत्रव्यवहार केला, पण उत्तर मिळेनासे झाले. आबासाहेबसुद्धा ह्या लोकांना कंटाळले; आणि त्यांनी आम्हांला जिल्हा परिषदेशीच संपर्क साधा, असे कळविले.

आम्ही मुख्यमंत्र्यांनासुद्धा भेटून आमची हकीकत सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या सेक्रेटरींनी आम्हांला त्यांना भेटूच दिले नाही. महाराष्ट्रात आमच्या प्रश्नाला वाचा फुटेना, म्हणून आम्ही दिल्लीश्वरांकडे (केंद्र सरकारकडे) धाव घेतली. आम्ही पंतप्रधान, राष्ट्रपती आणि काँग्रेस अध्यक्ष ह्यांना निवेदने पाठविली; पण त्यांनीसुद्धा ह्या प्रश्नाकडे आस्थेने न पाहता आपल्या सेक्रेटरीद्वारे महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवाकडे पुढील तजविजीकरिता पाठविले आहे. अद्याप कोणतीच तजवीज झाली नाही !

तालुका पंचायतीने धुडकावले म्हणून जिल्हा परिषदेकडे गेलो, जिल्हा परिषदेने हाकलले म्हणून ग्रामविकास मंत्र्याकडे गेलो. त्यांचेही ह्या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांपुढे काही चालेना, म्हणून आम्ही गृहमंत्री, मुख्यमंत्री ह्यांच्याकडे गेलो. त्यांनी जिल्हा परिषदेकडे बोट दाखविले. महाराष्ट्र सरकार लक्ष देईना म्हणून केंद्राकडे गेलो तरीही आमच्या मागणीची दाद लागेना. स्वतंत्र देशाच्या लोकशाहीत सामान्य माणसाच्या मागणीला कितपत महत्त्व आहे हे ह्यावरून स्पष्ट होते. ●

## □ ऑस्ट्रेलियात भारतीय संगीत

ऑस्ट्रेलियन ब्रॉडकास्टिंग कमिशनचे भूतपूर्व अध्यक्ष सर चार्ल्स मोझेस नुकतेच दिल्लीमार्गे प्रवास करताना म्हणाले, "गेल्या काही वर्षांत भारतीय संगीतकारांनी व नर्तक-नर्तिकांनी ऑस्ट्रेलियाला भेट दिल्यामुळे आता ऑस्ट्रेलियन जनतेला भारतीय संगीत कळू व आवडू लागले आहे." उलट ऑस्ट्रेलियन लोक-संगीत आकाशवाणीने वाजविले तर तेही येथल्या रसिकांना आवडू शकेल, असा त्यांना भरंवसा वाटतो.

## " फटकळ भक्ताचा सवाल "

विटेवरी उभा याचे कटेवरी हात ।
' तुकया ' रे मेला तुझा पंढरीचा नाथ ! ॥ १ ॥

दृष्टि याची गोठलेली धूर गेला डोळा ।
जोति कर्पुर-आरती दिसावी कशाला ? ॥ २ ॥

आरती-मदिरा धुंद बंद झाले कान ।
कशी ऐकू यावी याला किंकाळी करुण ? ॥ ३ ॥

भोवताली भक्त भोंदू बडव्यांचा मेळा ।
" नामदेव पायरीला " चाले काणाडोळा ॥ ४ ॥

घेशी भेटी धनिकांच्या मिधा तू विठ्ठला ।
कसा पुसशील, " पैसा कोठून आणिला ?" ॥५॥

दूध नाही छोटया बाळा आधाशी विठ्ठला ।
तुला आरतीला लाच लोण्याचा रे गोळा ॥ ६ ॥


" ऐसे काही देवा झाले ? " भक्त पुसे त्याला ।
" पूर्वजन्म सुकृताचा " दिलासा फेकिला ॥ ७ ॥

शेठ, सत्ताधीश मत्त यांनी हा वेढिला ।
सुखभोगी विसरला आम्हा लेकराला ॥ ८ ॥

" नाठाळाचे माथा काठी " हाण तू विठ्ठला ।
हाती घे पैजारा, विंचू राऊळात आला ॥ ९ ॥

रोकडी प्रचीति दे रे पंढरीच्या राजा ।
नाहीतर सज्ज आहे खेटरांची पूजा ॥ १० ॥

— पां. वि. केळकर



## लीला

अमाप जळाचा
विशाल सागर
माधुरीच्या हाती
रिकामी घागर
विशाल नभाची
विशाल सावली
अश्रूंत भिजते
मायेची मायली
कवि प्रतिभेला
कुसुमाचे मन
निर्मळ प्रीतीचे
अमर जीवन

—गोविंद कुलकर्णी

# आस्वाद

देवाला स्वार्थी दुढाऱ्यांनी आणि भोंद्नी वेढले आहे. पण देव वतनदारांना जवळ करून खऱ्या गरीब भक्तांना दूर लोटतो आहे हे खरे आहे का? दृश्य दिसते खरे असे. 'फटकळ भक्तांना सवाल' या अभंगात पां. वि. केळकर देवाला कठोर व्हायला सांगत आहेत. पहिले दैन्याचे चित्रण हृदयभेदक आहे. पुढे तुकाराम महाराजांना कडकडीत अवतार प्रकट झाला आहे. 'धर्म ही अफू आहे' असे साम्यवादी मानतात. पण येथे धर्माचे अनिष्ट परिणाम नाहीसे करण्यासाठी कवी देवाला विनवित आहे. छंदाचा बोज कवीने चांगला राखला आहे. 'आरती-मदिरा धुंद' हा शब्दप्रयोग अप्रसन्न वाटतो आणि लयही बिघडते. बाकी कवितेतली तळमळ हृद्य आहे.

'लीला' ही गोविंद कुलकर्णी यांची कविता विरोधाभासाने सुरू होते. मनाची पकड घेते. पण पुढील कडव्यात तो विरोधाभास टिकविलेला नाही. पुढे एकेक विधान आहे. स्वतंत्र आणि सुटे; अर्थात् ते मनाला पटते. पटावे अशाच भाषेत मांडले आहे. कवितेचे शिल्प चांगले आहे.

जानेवारी १९६८ अखेर, कविता-साहित्य स्वीकृत केले असल्यामुळे, साप्ताहिक 'माणूस'कडे येणाऱ्या यापुढील कवितांची दखल घेणे वेळेअभावी शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही साहित्यासोबत पुरेसे टपाल नसल्यास त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करता येणार नाही. कृपया या अडचणीची नोंद घेतली जावी. —सं.

# भेट

महादेव मोरे



"ये! अगदी जायच्या वेळी आलास ... मी पाठविलेला निरोप मिळाला नाही का तुला?"

"मिळाला ना, त्याच वेळी. त्याच दिवशी!"

"पण त्या दिवसाला एक महिना होत आला, होय ना?"

"होय...खरंय् तुझं!"

"आणि हे खरंय् की, आज आलास; होय ना?"

"हो...तशी मला सवडच मिळाली नाही बघ—व्यवसायातून..."

"म्हणजे 'सवडीनुसार भेटून जा,' असा निरोप पाठविला होता, त्याचा हा असा अर्थ लावलास तर! होय ना?"

"नाही ... तसं नाही... माणूस एकदा व्यवसायात, व्यवहारात अडकून पडला की, सवड अशी मिळतच नाही त्याला...तुला याची कल्पना नाही यायची! उगीच गैरसमज करून..."

असा आग्रह करू नकोस. उगाच ओझं बाळगू नये शिरावर. पेलवत नाही ते. आणि तुला माहीतच आहे–माझ्यासाठी एखाद्यानं त्रास घेतलेला आवडत नाही मला !

" म्हणजे, माझ्यासाठी, मला भेटण्यासाठी काही काळ, काही वेळ व्यवहार बाजूस सारता आला नाही तुला !"

" हे पाहा, अशी उलटतपासणी करण्यासाठीच मला भेटायला बोलाविलं होतंस का ? आता आलोय, तसं बैस तरी म्हण ना, की असाच उभा करून ठेवणार आहेस मला– प्रश्नचिन्हासारखा !"

" अरे हो ! विसरलेच पाहा मी. भानच राहिलं नाही बघ...बैस ना !"

" हं ऽ, हा घे बसलो– अगदी आरामात ! आता फक्त एकच इच्छा– सिगारेट शिलगवावी म्हणतो... तुझी काही हरकत नाही ना ? नाहीतर असं व्हायचं– पूर्वी मी धूम्रपान केलेलं तुला आवडायचं नाही; मग तुझं 'धूम्रपान आणि कॅन्सर' यांवर एक व्याख्यान झडायचं; तेव्हा भीती ही की, आताही तुझं ते..."

" ओढ ना, माझी हरकत कसली असायला...? पूर्वीचे दिवस तर केव्हाच ओसरले आहेत..."

" थँक्यू ऽ मेलॉर्ड, आता उलट तपासणीच्या कामाला सुरुवात व्हायला हरकत नाही !"

" अगदी पूर्वीसारखा स्वभाव राहिलाहे बघ तुझा ! नाही त्या वेळी बरी चेष्टा सुचत्येय तुला ! माणूस गंभीरपणे बोलताना ऐन वेळी मध्येच असं बोलून अवसान-घात करण्याची ही चांगली पद्धत आहे तुझी !"

" बरं आजीबाई, झाली चुकी, केली माफी म्हणा म्हणजे सुटका झाली !"

" बघ, लागलास बरळायला ! गंभीर असं होताच यत नाही का तुला ?"

" येत होतं तर– कोणे एके काळी ! पण एक वादळ अचानक आलं नि गंभीर होणंच विसरून गेलो !"

" अगदी कवीच्या भाषेत बोलू लागलाहेस बरं का ! बरं; असं का, कशामुळं, कुणामुळं आलं...?"

" मी उगीच दोषी कुणाला ठरवू ? वादळ आलं माझ्यामुळंच. मीच जर नसतो तर तुझी–माझी ओळख झाली असती का ? ओळखीच्या डहाळीला प्रेमाच्या कळ्या लागल्या असत्या का ? कळ्यांची फुले उमलली असती का ? फुलांचा सुगंध दरवळला असता का ? त्यानं दोघांचं जग भारून टाकलं असतं का ? पण...पण

तुझं लग्न झालं, त्याच वेळी हे सगळ संपल. मिटल. नंतर मग काही दिवस वाटली ती एक रुखरुख, एका भयाण नि एकाकी पोकळीतील दारुण व्यथा... पण आता ते सारं मागं पडलं आहे. फार फार मागं पडलं आहे...जुनं झालं आहे...आणि खरं सांगू का तुला ? ते सारं मी विसरूनही गेलो होतो..."

"पण...पण मी विसरले नाही रे...पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी आले, आणि आल्याबरोबर प्रथम आठवण झाली ती तुझीच. मध्यम उंचीची, भरगच्च, सावळी नि करारी; पण किंचित् रागीट स्वभावाची तुझी मूर्तीच प्रथम आठवली...आणि भेटून जाण्याचा निरोप पाठविला...एकदा नव्हे, तर दोनदा !"

"का निरोप पाठविलास ? खरंच, मी विसरून गेलो होतो बघ सगळं ! एक ठेंगणीशी, गोरीपान, बदामी डोळ्यांची मुलगी...डाव्या डोळ्याखाली दिसेल न् दिसेल असा बारीकसा तीळ असलेली नि सुंदर, नीटस चेहरा लाभलेली मुलगी... तिची प्रथमची ओळख...चोरून झालेल्या त्या भेटीगाठी...त्या वेळी होणारं तुटक अस्पष्ट बोलणं...आणि पत्रांतून मनं मोकळी करणं...ते मंतरलेले सुगंधी दिवस आणि त्या काटेरी रात्री...सारं, सारं विसरून गेलो होतो मी...एका अगदीच अपरिचित, अनोळखी मुलीशी विवाह करून जीवनाशी तडजोड केली होती...तूच पूर्वी एका पत्रात लिहिलं होतंस ना– एका चांगल्या मुलीशी लग्न करून सुखी हो म्हणून ? हां, तर असं मी सुख मानायला शिकलो होतो. नव्हे, तसं मनाला फार प्रयत्नानं शिकविलं होतं...तेव्हापासून सारं कसं शांत होतं...सरळ रेषेत जाणारं होतं...पण तुझा निरोप आला नि मनात खळबळ माजली, आणि त्याच वेळी ठरविलं होतं की, जायचं नाही..."

"का ठरविलंस असं ? इतकं दूर पळायचं होतं, इतकं तोडून टाकायचं होतं तुला ?"

"होय. तुझं लग्न झालं तेव्हाच तू परकी झालीस. आणि अशा वेळी दूर जाणं, तोडणंच चांगलं–तुझ्या दृष्टीने नि माझ्याही; नाही का ? आणि खरं सांगायचं तर, पुष्कळ वेळा स्त्री अविचारीपणे वागते...तेव्हा तू मला निरोप पाठविण्यामागे तितकासा विचार केला असशील, असं मला नाही वाटत !"

"नाही. तसे नाही. मी पूर्ण विचार करूनच निरोप पाठविला होता तुला... की माझीच भीती वाटली तुला? मोह घालील, गुरफटील, असं वाटलं तुला ?"

"खुळी आहेस तू. वेडे, असं वाटलं असतं तर इतक्या दिवसांच्या परिचयांत मी तुला ओळखलीच नाही, असं म्हणावं लागेल...मला भीती वाटली ती दुसरीच– मी तुला भेटलो होतो, इतका–इतका वेळ एकांतात बोलत बसलो होतो, हे तुझ्या नवऱ्याला समजलं तर...? विचार केला होतास याचा...?"

"त्यांना तुझ्या–माझ्याविषयी बहुतेक सारं माहीत आहे. मीच सांगितलं आहे हे सर्व..."

"एका विवाहित स्त्रीला एक परपुरुष अशा दुपारी भेटतो, फार वेळ बोलत

बसतो—याचा तितकासा चांगला अर्थ काढला जातो का...? याचा काही विचार...?

"याचाही विचार केला होता तर !"

"मग...?"

"मग काय ? असल्या बारीक गोष्टींत लक्ष घालायला कोणाला वेळ असतो हल्ली...? आणि कुणाचं लक्ष गेलंच तर साऱ्यांचीच मनं काही कुजलेली नसतात. मला एका गोष्टीची मात्र गम्मत वाटते— लोकांची इतकी भीती बाळगायला हा इतका भित्रा कसा झालास तू...? त्या वेळचा तुझा तो जगाला दाढेत पकडू पाहणारा निर्भीडपणा, बेडरपणा कुठे गेला...?"

"माणूस संसारात पडला की तो असाच बनतो. बोटचेप्या स्वभावाचा, भित्रा. लोकांना असं भिऊनच राहावं लागतं...कारण त्यांच्यांत राहून आयुष्य घालवायचं असतं...नाती जोडायची असतात...संबंध यावयाचे असतात..."

"ह्या साध्या गोष्टींपायी इतका नि एवढा विचार केलास तू ?"

"का करू नये ? आणखी म्हणजे या भेटीचा फायदा घेऊन माझ्या हातून काही..."

"माझा विश्वास आहे तुझ्यावर. तुझं-माझं प्रेम जर खरं होतं, तर तुझ्या हातून काही दुर्वर्तन होईल, ही शंका तरी मी का घ्यावी ?"

"दिवस उलटतात, वर्षे जातात, काळ पालटतो आणि माणसे बदलतात— माहीत आहे तुला ?"

"ज्यांना 'माणसे' म्हणतात ती, पण अशा वाईट प्रकारे बदलत असतील, असं मला नाही वाटत !"

"जगाचा तुझा अनुभव फारच थोडा आहे बघ !"

"आणि तेच बरे आहे; कारण त्यामुळे मी तुझ्याबद्दलचे वाईट विचार करूच शकत नाही !"

"कसं समजावू तुला...माझी वेदना...माझं दुःख...माझी तडफड...तुझ्या-विषयी लोकांत उगीच बभ्रा होऊ नये म्हणून आजपर्यंत मन आवरलं...फार वेळा मनाविरुद्ध वर्तन केलं...स्वतःला सावरलं...पुष्कळ वेळा तुलाही याबाबत मदत केली...थोपविलं...आठव—पुष्कळ वेळा तुझ्या—माझ्या सहवासात असे मोहाचे निसरडे क्षण आले नव्हते का ? प्रत्येक वेळी विचाराचे बंधन माझ्यावर असायचे—माझ्या-पेक्षाही तुझ्या विचारांचे...तुझ्या घरच्यांचे...घराण्याचे...आणि समाजाचेही..."

"तू असे व्यवहारी प्रेम केलेस— तोलून, मापून नि विचार करून ! पण मी... मला त्या वेळी तुझ्याशिवाय काहीच दिसत नव्हतं...सुचत नव्हतं...तुला असं बेहोष होऊन, देहभान विसरून प्रेम करता नाही आलं. नाही यायचं !"

"पहिलं प्रेम हे पुष्कळ वेळा असंच बेहोष करून सोडणारं, देहभान विसरून टाकणारं, प्रसंगी जगाला दाढेखाली रगडण्याची हिम्मत अंगी जोपसणारं असतं...

तुझ्या बाबतीत ते पहिलं प्रेम होतं...पण माझ्या बाबतीत...?"

"काय होतं...?"

"दुसरं प्रेम...खरंच, दुसरं प्रेम ; तुला माहीत आहे ?"

"आजपर्यंत तरी नव्हतं माहीत. पुढंही माहीत झालं नसतं. तूच सांगितलंस म्हणून समजलं. पटलं, खरं वाटलं !"

"अशीच एक निष्पाप मुलगी होती...बाळबोध वळणाची; आणि खरं सांगू ? तुझ्यापेक्षाही काकणभर सुंदर, तुझ्यापेक्षाही उंच, सडपातळ, रेखीव आणि माझ्यावरून जीव ओवाळून टाकणारी; अन् हे मला जेव्हा समजलं, जाणवलं तेव्हा ती ह्या जगात नव्हती ! तिच्याबद्दल माझं मन ओढ घेत होतं. झेपावत होतं; हे मी नाकबूल करीत नाही. पण अशा बालबोध, साध्या, सरळ मुलीला प्रेमाची भूल घालून भुलविण्यासारखं मोठं पाप नव्हतं, असं त्या वेळी मला वाटलं. भुलविणं अशासाठी म्हणतो की, तिचं–माझं प्रेम जरी जमलं–वाढलं असतं तरी तिच्याबरोबर विवाह करणं शक्य झालंच असतं, असं नाही...कारण मी त्या वेळी एक साधा विद्यार्थी होतो– कॉलेजच्या फीपासून सिनेमाच्या तिकिटापर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी आई–बापाकडे हात पसरणारा असा, परावलंबी, दुबळा, लंगडा ! आणि प्रेम निभावून न्यायचे असेल तर असे असून उपयोगी नसते ! स्वतःच्या पायांवर खंबीरपणे उभे राहण्याची सिद्धता पाहिजे...हाताशी थोडाबहुत पैसाही पाहिजे आणि अशांचंच प्रेम सफल होतं. बाकीचे मात्र प्रेमभंगाचं ओझं जन्मभर उरावर ठेवून तळमळत असतात !"

"तुझं म्हणणं खरं धरायचं तर तू या दुसऱ्या प्रकारात जमा होतोस..."

"माझं म्हणणं खरंच आहे. पण मी या दुसऱ्या प्रकारात मोडत नाही; तसेच पहिल्या प्रकारातही. तिच्याविषयी माझ्या मनात ओढ होती, पण ती मी दाखविली नाही. आणि तिच्या मनात तर फक्त मी नि मीच भरून राहिलो होतो...आणि हे जेव्हा मला समजलं तेव्हा ती कुठंच नव्हती...मी पायांना चक्र लावलं...सर्वत्र शोधलं...गावं, शहरं, गल्ली, बोळ...सगळीकडं...पण ती कुठंच आढळून आली नाही...कदाचित्...कदाचित् ती या जगातही नसेल...ती एक फार मोठी शोकान्तिका घडली...अन् त्या वेळी मला जे दुःख झालं, त्यानं माझं कठोर काळीजही लोण्यासारखं विरघळलं नि तिच्यासाठी माझे डोळे भरून आले. ह्यालाच प्रेमभंग म्हणावयाचा का ? हे जे काही झालं त्याला हे असलं नाव आहे का ? जर नाही तर मग काय म्हणायचं याला ?"

"खरंच रे, इतका खोलवर विचार मी तरी करीत नाही. तरी पण मला वाटतं– काही प्रश्न असे असतात, ज्यांची उत्तरंच नसतात...ती शोधायचीही नसतात..."

"ती माझ्या आयुष्यातून निघून गेली; आणि इथंच माझं पहिलं प्रेम संपलं...

उमलणारी कळी अशी अर्धीच राहिली...एक कथा अशी अर्ध्यावरच संपली... नंतरचे काही दिवस रखरखीत वाळवंटावरून गेल्यासारखे सरपटले. मग तुझी ओळख झाली...वठलेलं झाड होतं. अचानक वळवाची एक सर आली, नवी पालवी फुटली गेली...पण पहिली जखम अजूनही बुजली नव्हती. तिनं मला विचारी केलं. तिनंच तुझ्या सहवासात माझ्या आधीं तुझा विचार करायला शिकविलं...अर्थात, हे होत असताना हेही मी जाणून होतो की, या वाढत चाललेल्या ओळखीचं, प्रेमाचं रूपांतर पुढे विवाहात होणं कठीण आहे...फार फार कठीण आहे...जातीधर्माच्या अनेक भिंतींनी निर्माण केलेला हा कठीणपणा तोडणे केवळ अशक्य आहे...तुला व मलाही...तेव्हां ह्यापासून काही निष्पन्न होणार असेल तर तो एक नवा मानसिक ताण...एका नव्या व्यथेचा जन्म...अर्धीच राहणारी एक जीवघेणी कहाणी.. हे सारं समजत होतं, उमजत होतं...पण ते बंद करावं असं मात्र हातून काहीच घडत नव्हतं...हे संपवावे, बंद करावे म्हणून मध्ये काही दिवस मी अबोलाही धरला होता...पण त्या वेळी वरचेवर तू आपल्या मैत्रिणींकडून विचारणा करीत होतीस–'का अबोला धरला आहेस ? असं कोणतं कारण झालं ? माझं काही चुकलं का ?' ह्याची उत्तरं द्यायची टाळाटाळ करी मी. तेव्हा मग आपण होऊन तू भेटायला यायचीस...आणि मग त्या भेटीत पूर्वीचा संकल्प केव्हाच वाहून जायचा...परत नवी चिंता...नवी व्यथा...त्या वेळी माझ्या मनात जी काही आवर्तं माजली, त्यांची कल्पना यायची नाहीं तुला. प्रेमाची डहाळी डंवरत असताना, हे सारं होतं, होत असतं; हे तुला पटायचंही नाही...आणि हे असं जे काही वर्तन मी केलं, त्यालाच व्यवहारी प्रेम म्हणायचं का ? व्यवहारापासून फायद्याची अपेक्षा असते. पण ह्यापासून मी कोणता फायदा मिळविला ? व्यथा, तळमळ, मानसिक ताण-त्रास हाच ना फायदा ? की आणखी काय...?"

"खरंच रे ऽ, याही प्रश्नांची उत्तरं..."

"ही पळवाट झाली..."

"नाही. ही पळवाट नव्हे रे. वस्तुस्थिती आहे ही. आमचे स्त्रियांचे जग चार भिंतींतले. घरातले. बंदिस्त....बाहेरल्या व्यवहाराशी, वस्तुस्थितीशी आमचा तितकासा संबंध येत नाही ... आणि आलाच तरी तुम्हा पुरुषांइतका येत नाही. तुमची अनुभव घेण्याची बेडर वृत्ती, अनुभवाला–संकटाला सामोरी जाण्याची बेदरकार, निडर वृत्ती आमच्याजवळ नसते....बुद्धीवर असे हे आवरण असलेलें. म्हणून वाढ खुंटते...कदाचित् हेच याचे कारण असेल.

"सर्वसामान्य स्त्रियांच्या बाबतींत कदाचित् हे खरेहीं असेल...किंवा आहे असं जरी म्हटलं तरी तुझ्याबाबत हा निकष कसा लावावा ? सर्वसामान्य स्त्रियांसारखी तू नव्हेस. चारजणींसारखीदेखील नव्हेसं...तर चारजणींहून वेगळी आहेस... निराळी आहेस..."

" काय अनुभव आहे तुझा–याबद्दल...?"

" अनुभवाशिवाय मी मत तरी कशाला बनवू ? तुझ्या मनाविरुद्ध तुझं लग्न झालं. घरचे वडील असून नसल्यासारखे–निष्प्रभ. त्यामुळे तू आईबरोबर भांडलीस. घरच्या इतर सर्वांवर राग धरलास अन् तो जोपासतच सासरी गेलीस. दोन-एक वेळा इकडून माहेराहून–बोलावणं आलं...पण तू आली नाहीस...आणि बाळंतपणासाठी आता जी आली आहेस ती ' माहेरी ' म्हणून नव्हे. वास्तविक माहेरी म्हणजे आई-बापांचे घरी राहायला पाहिजे...पण तुझ्या तेजस्वी, निश्चयी, मानी स्वभावाला हे पटण्यासारखं नव्हतं. ज्या आई-बापांबरोबर अबोला धरला, ज्या घरच्या माणसांवर रागावलो, ज्यांनी बोलावणं पाठवूनही आपण आलो नाही; त्यांच्या घरी कसं राहायचं, जायचं ? अन् असा विचार करूनच तू तुझ्या ओळखीच्या एका बाईकडे उतरली आहेस. ही बाई तुझ्या दूरच्या नात्यातील आहे व तुझ्या वडिलांशी तिचे संबंधही होते; त्यामुळे स्वतःच्या मुलीप्रमाणं तिनं तुझं सारं काही केलं...तुझा निरोप मला आला आणि हे सर्व मला त्या वेळी समजलं. मला तुझ्या ह्या मानी स्वभावाचा फार अभिमान वाटला बघ...अशी दुसरीकडे, तेही आई-बापाचे घर सोडून राहिल्यामुळे पुष्कळांनी तुला नावे ठेवली असतील, बोल लावले असतील, लावतही असतील...पण मी नाही लावणार ! जिला मी जगाची थोडी का होईना, पण कटू वाटणारी अशी ओळख शिकविली, जिच्या मनात मानी, करारी, तेजाळ स्वभावाची ज्योत सतत तेवत ठेवली; तिच्याकडून अशाच न झुकणाऱ्या, न मोडणाऱ्या स्वभावाची मी अपेक्षा केली होती..."

" आणखी काय काय अपेक्षा केली होतीस...?"

" थट्टा नाही करीत मी...खरं ते..."

" पण मी तसं कुठं म्हटलं...?"

" हं ऽ, आलं लक्षात ! अशी थट्टा करण्याची एकाएकी लहर आलीय् तुला, तेव्हा माझं बोलणं आवडू लागलंय् म्हणायचं तर !"

" नाही रे बाबा ! तसं नाही !"

" आणि माझं असं बोलणं आवडू लागलं म्हणजे ' नाही रे बाबा ' म्हणायचीस, नाही का ? आठवतं का ?"

" विसरेन असं वाटलं ? वाटतं ?"

" मला नाही वाटत तसं."

" मग झालं तर ! खरंच रे–त्या वेळचं आपलं ते सारं वागणं आता आठवलं की, तो सारा खुळेपणाच वाटतो, नाही ?"

" होय ना ! आता लग्न झाल्यावर पूर्वायुष्याकडे फार तटस्थपणे पाहता येतं... अशा या पाहण्यात पूर्वीचा हळूवारपणा राहत नाही; आणि उगीच वाटायला लागतं—त्या वेळचं ते बेभान प्रेम, ती ओढ, ते आकर्षण हे सारं खोटं होतं ..प्रेम,

प्रेम असं ज्याला आपण म्हणत होतो, ते तारुण्यातील प्रथम अवस्थेतील एक-मेकांबद्दल वाटणारे केवळ शारीरिक आकर्षण होते. तेवढ्यानंच मनं उचंबळून आली, काही स्वप्नं पाहिली आपण...इतकंच, एवढंच. पण स्वप्नं कधी खरी होतात का...? आणि तशी ती व्हावीत असं आपणांस वाटलं, हेच नाही तरी चुकलंच नाही का! तेव्हा, आता काय खरं असेल तर ते इतकंच—आपली पत्नी, आपली मुलं, आपला संसार!"

"म्हणजे, आपलं प्रेम खोटंच होतं तर! रोमिओ–ज्युलिएट, लैला-मजनू, शिरीं-फरहाद यांनीही प्रेमच केलं नाही का? त्यांच्या कथा युगानुयुगं आपण सांगत, गात आलो, तेसुद्धा इतकंच खोटं का...?"

"नाही. ते खोटं नक्कीच नाही. ती माणसंच निराळी होती. जमिनीवर राहून अस्मानाची स्वप्नं पाहणारी होती ती. त्यांची बरोबरी व तुलना आपण सामान्य माणसांनी करू नये, हेच बरं! प्रेमभंगाच्या जखमा उरी बाळगून जन्म काढणारी अन् फावल्या वेळी त्या कुरवाळीत बसणारी आपण माणसं! त्यांच्या लौकिक प्रेमकथा चघळीत नि पुनःप्रत्ययाचा आनंद उपभोगीत बसण्यापेक्षा दुसरं काय शक्य आहे आम्हांला? आकाशाचं दान मागायचं झालं तर आपली झोळीही त्या तोलाची असावी लागते!"

"त्या वेळचं ते प्रेम आता इतकं खोटं वाटतं; पण त्या वेळेस खरं कसं वाटतं, इतकं मन वाहून कसं जातं, जिवाची कुरवंडी कशी करता येते? ते प्रेम इतकं खोटं असतं तर त्यासाठी बरेचजण आत्मनाश करून का घेतात? हे कसं घडतं...?"

"प्रेम हे अफूसारखं असतं. घेईल तसा अंमल चढत जातो. मग माणूस हवेत तरंगू लागतो. आणि जास्तच प्रमाण झालं की..."

"ह्या विषयाचा बराच नव्हे, पुष्कळच अभ्यास केला आहेस म्हणेनास!"

"असे रेशमी चिमटे बरे काढता येतात बघ तुला!"

"हा तुझ्याच सहवासाचा परिणाम!"

"आणि माझा अभ्यासदेखील तुझ्याच सहवासामुळे झाला ना!"

"म्हणजे, ह्या सहवासाचा फायदाच झाला म्हणायचा तर!"

"हो ना! मला तरी झाला...आता तुझी बाजू मी कशी सांगू, नाही का?"

"हे मानभावी का कायसं म्हणतात ते बोलणं झालं, असं म्हटलं तर राग नाही ना येणार!"

"छे: छे:, मी कधी तसा..."

"तसं नव्हे, राग नाकाच्या शेंड्यावर आहे, म्हणून म्हटलं! अशी माणसं केव्हा, कशी, कोणत्या कारणाने रागावतील हे ब्रह्मदेवाच्या बापालाही सांगता यायचं नाही!"

" बोलण्याहून बोलणं वाढत जातं; नि ब्रह्मदेवाचा बाप निघतो तो असा ! बरं, खूप वेळ झाला. निघू आता ?"

" बैस ना, थोडा चहा करते–घेऊन जा."

" छेः छेः, चहा नको आता. येथे आलो, भेटलो, तुझ्याशी बोलता आलं, मन मोकळं करता आलं, हेच पुष्कळ झालं नाही का ?"

" ते काही नाही. माझ्या आग्रहास्तव..."

" असा आग्रह करू नकोस. उगीच ओझं बाळगू नये शिरावर—पेलवत नाही ते, आणि तुला माहीतच आहे—माझ्यासाठी एखाद्याने त्रास घेतलेला आवडत नाही!"

" ह्या अशा गोष्टीला त्रास म्हणायचा का ?"

" मी म्हणतो ! चहा घ्या म्हटलंस, हेच पुष्कळ आहे. मी चहा घेतल्याप्रमाणे आहे. बरं, केव्हा जाणार आहेस तू येथून ?"

" परवाचे दिवशी जावं म्हणते—चांगला दिवस आहे..."

" त्या दिवशीही मी भेटायला यायला हवं का ? पण नकोच...इथंच अखेर झालेला बरा...नाही का ?"

"..............................................................."

" तुझा बाळ झोपला आहे ना ? उठल्यावर त्याला माझा पापा सांग, काय ?"

"..............................................................."

" अरे ऽ, हे काय ! डोळ्यांत पाणी भरतेस ? खुळी कुठली ! पूस डोळे ते ! पूस ना ! हं ऽ...आता मी जायला हरकत नाही ना ?"

"..............................................................."

" हे काय हे ! मी जायचे वेळीच मौनाची बाधा झाली का तुला ? बोलणारच नाहीस...?"

"...मी जाते आहे...पण...पण केव्हा पुण्याला आलास तर भेटून जायला विसरू नकोस."

" तुझे हे शब्द लक्षात ठेवीन..."

" बरं, जा आता. येथून जाण्यापूर्वी तुझी भेट व्हावी वाटलं होतं. आलास, भेटलास, बोललास. किती समाधान वाटलं म्हणून सांगू ! खूप वेळ घेतला तुझा मी... जा आता तू..."

" जातो. पण...पण उगीच पावलं रेंगाळतात. मन मागं ओढ घेत आहे... जायलाच हवं...जाणंच योग्य आहे..."


" बरं..."

" काही बोलणार होतीस का...?"

" न्...नाही ..छेः छेः......"

" बरंय्...चलतो मी...अच्छा..."

●



# कलेच्या फलितांची निष्फल चर्चा

## प्रतिभाविलास

प्रा. ना. सी. फडके गेली कित्येक वर्षे कादंबरीलेखन करीत आहेत. आजच्या नव्या पिढीला त्यांच्या कादंबरीमध्ये रस वाटत नसला तरी ज्या पिढीने त्यांच्या 'अटकेपार', 'जादूगार', 'प्रवासी', 'दौलत', 'अंजली' या कादंबऱ्या वाचल्या आहेत, तिला कादंबरीकार ना. सी. फडके यांची चांगली ओळख पटलेली आहे. फडके हे जुन्या पिढीचे हरी नारायण आपटे यांच्यानंतरचे मराठीतील एकमेव कादंबरीकार आहेत, एवढे म्हटले म्हणजे पुरे आहे !

आज त्यांनी साठच्या आसपास कादंबऱ्या लिहिल्या आहेत. आणि वयाची सत्तरी ओलांडूनदेखील अजूनही ते खुशालचेंडू तरुण–तरुणींची जीवनचित्रे कादंबरीच्या माध्यमातून रेखाटीतच आहेत ! कादंबरीलेखनाचे त्यांचे काम जसे एकीकडे

पु स्त के

अव्याहत चालू आहे; तसेच साहित्यशास्त्राविषयीही ते अखंडपणे लिहीतच आलेल आहेत. याही पुढे जाऊन असे म्हणावे लागेल की, फडके हे नुसतेच साहित्यशास्त्रावर लिहून राहिले नसून संगीत, नृत्य, शिल्प, चित्र, सिनेमा, क्रिकेट आदींवरही त्यांनी खूपच लिहिलेले आहे.

त्यांच्या वयाकडे आणि त्यांच्या लेखनसंभाराकडे पाहिले की वाटते, ते हे की, फडके जीवन जगत नसून ते साहित्यच जगतात. त्यांच्याइतका हव्यासी, आहोपी, उत्साही, अंतर्बाह्य रसरसलेला लेखक माझ्या तरी पाहण्यात नाही.

नुकतेच सात–आठ महिन्यांपूर्वी त्यांचे प्रतिमाविलास नावाचे एक नवीन पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. आजवर साहित्याच्या निरनिराळ्या अंगांवर लिहून झाल्यावर पुन्हा आणखी फडके यांनी आता नवीन काय काढले बुवा ? त्यांचे हे पुस्तक पाहून माझ्या मनात प्रश्न आला. परंतु पुस्तक वाचून संपविल्यावर तसे त्याच्यात नवीन काहीच नाही हे लक्षात आले.

साहित्याच्या प्रक्रियेविषयी, त्याच्या हेतुविषयी, लोकसाहित्याविषयी आणि साहित्य आणि साहित्यिक यांच्यांतील संबंधांविषयीची फडके यांची पुरातन मतेच त्यांनी त्यांच्या या नव्या ग्रंथात नटवून–थटवून उच्चारलेली आहेत !

साहित्य शास्त्राच्या बाबतीत तरी असे म्हणणे भाग आहे की ते परपुष्ट आहे. त्याची कारणे अनेक आहेत. एक तर संस्कृत साहित्यशास्त्राचे निकष इतके पुरातन आणि ठोकळेबाज आहेत की, त्यांचा उपयोग आधुनिक (Modern) साहित्याला सुतराम होण्यासारखा नाही. मग उरते ती इंग्रजी साहित्यशास्त्रातील उचलेगिरी ! पण त्याही बाबतीत कठीण गोष्ट अशी होऊन बसलेली आहे की, मराठी ललित साहित्यापेक्षा इंग्रजी ललित साहित्य चहूबाजूंनी संपन्न आहे. अर्थात साहजिकच त्या संपन्नतेचा आविष्कार त्यांच्या साहित्यशास्त्रातही झालेला आहे. मराठी ललित साहित्याच्या अनुषंगाने इंग्रजी साहित्यशास्त्राला हात घालणे म्हणजे रावणाने शिवधनुष्य उचलण्याचा आत्मघातकी उद्योग करण्यासारखे आहे !

प्रा. फडके यांचे ‘ प्रतिभासाधन ’ काय अथवा ‘ प्रतिभाविलास ’ काय, त्यांतील सूत्रे एक तर जुनाट झालेली आहेत, अथवा ती गैरलागू तरी ठरलेली आहेत; परंतु प्रा. फडके यांचे त्या सूत्रांविषयीचे आकर्षण मात्र आजही कमी झालेले दिसत नाही !

आता हेच पाहा. मी त्यांच्या पुस्तकातील खालील काही सिद्धांतवजा वाक्ये देतो. म्हणजे लक्षात येईल की, हे विचार कितीतरी जुने झालेले आहेत ! ‘ साहित्यात आविष्कृत होणाऱ्या भावना नेहमीच लेखकाच्या स्वतःच्या नसतात, ’ ‘ अक्षरसाहित्याचा गुणविशेष ! ’, ‘ प्रेरणेतून वासना आणि वासनेतून भावना–’, ‘जे सुंदर असतं ते शिव असलंच पाहिजे काय ?’ ‘ आणि कलेसाठी कला या वचनाचा खरा अर्थ. ’

या काही वाक्यांशावरून सहजपणे लक्षात येण्यासारखे आहे ते हे की ' प्रतिभा-विलास ' या त्यांच्या नव्या ग्रंथात प्रकाशन-वर्षापेक्षा नवे असे काही नाही !

प्रकरण ९ मध्ये फडके यांचा विषय आहे ' नवकथा ! एक चिंतन आणि चिंता ! ' विषयाच्या मथळ्यावरून त्याच्या उथळपणाचे स्वरूप लक्षात येते. अर्थात या मथळ्यामध्ये किंचितशी विनोद निर्मितीही झालेली आहे. ती अशी की प्रा. फडके यांच्या बाबतीत ' चिंतनाचा ' अनुभव आजवर कोणालाही आलेला नाही ! त्यांचे ललित साहित्य घ्या किंवा त्यांचे विचारप्रधान साहित्य घ्या, त्या दोन्हींत कशाचा अभाव जाणवत असेल तर तो ' चिंतनाचा ' आहे. कारण त्यांच्या पन्नासावर कादंबऱ्यांमध्ये वातावरण बदललेले दिसेल, निसर्गवर्णने बदललेली दिसतील, स्थळे बदललेली दिसतील, क्वचित् प्रसंगी आतील माणसेही बदललेली दिसतील; परंतु जीवनदर्शन घेण्याची आणि ते घडविण्याची त्यांची उंची, लांबी, रुंदी आणि खोली तीच आहे ! याचे कारण हेच की फडके हे लेखक होऊ शकलेले आहेत, परंतु ते चिंतक होऊ शकलेले नाहीत.

अशा परिस्थितीत त्यांनी नवकथेचीच काय, परंतु कुठल्याही साहित्याची चर्चा करणे केवळ व्यर्थ आहे. ज्याची कलेचा आणि जीवनाचा अर्थ शोधण्याची शक्ती आणि जिज्ञासा जिवंत आहे, त्याने करावयाच्या या गोष्टी आहेत.

अर्थात फडके यांच्या प्रतिभाविलास हा ग्रंथ आजच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी उपयोगी पडणारा ग्रंथ आहे असे का म्हणू नये ?

वि. शं. पारगावकर

●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## □ नवऱ्याचा शिरच्छेद !

आता पूर्वीसारखी नवरेशाही राहिलेली नाही. समान हक्कांच्या या जमान्यात बिचाऱ्या नवऱ्याला आपल्या बायकोवर हात टाकण्याची सोय उरलेली नाही ! तथापि, नेपाळच्या सरहद्दीजवळच्या इलाख्यातील संगर डोमरी गावातील बायकांना आपल्या नवऱ्यावर केवळ हात टाकण्याचाच नव्हे तर त्याचा शिरच्छेद करण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त आहे !

घाबरू नका ! त्या प्रथेचं लोण महाराष्ट्रापर्यंत येणार नाही; आणि आलं तरी घाबरायचं कारण नाही! कारण, नवऱ्याशी पटनासे झाले म्हणजे या गावातील बायका अक्षरश: आपल्या नवऱ्यांचा शिरच्छेद करीत नाहीत. फक्त केळीच्या फांदीचा शिरच्छेद करतात आणि नवऱ्याबरोबरचे सर्व संबंध तोडून टाकतात ! म्हणजे 'शिरच्छेद' फक्त लाक्षणिक अर्थानंच घडतो. तथापि नवऱ्याऐवजी बायकोनं संबंध तोडण्याचा हा प्रकार व त्यासाठी अवलंबण्यात येणाऱ्या केळीच्या झाडाच्या कत्तलीचे प्रतीक हे सारेच अपूर्व, अद्भुत होय !

## □ शिक्षण आणि सरकार !

सरकारी अनुदानावर चालणाऱ्या खासगी शाळांना फी वाढविण्याची परवानगी नाकारताना महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी जो खंबीरपणा दाखविला, तो स्तुत्य होय. तसेच त्यांनी शिक्षकांना द्याव्या लागणाऱ्या वाढीव महागाईभत्त्यावर सरकार शंभर टक्के अनुदान देईल, असे जाहीर करून फारच सुयोग्य असा सुवर्णमध्य गाठला आहे; कारण शिक्षकांना महागाईभत्त्यात वाढ करण्याबाबत कोणाचेच दुमत नव्हते. प्रश्न होता, तो ह्या खर्चाची तोंडमिळवणी कशी करावयाची हा ! कारण, काही शिक्षणसंस्थांना ते खरोखरीच अशक्यप्राय होते ! हा पेच कुशलतेने सोडवल्याबद्दल श्री. चौधरी यांचे अभिनंदन.

तथापि केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुणसेन यांनी म्हटल्याप्रमाणे केवळ आर्थिक दौर्बल्य हीच एकमेव शैक्षणिक समस्या नव्हे ! सांप्रतच्या शिक्षण पद्धतीत आमुलाग्र परिवर्तन करणे अपरिहार्य आहे. शिक्षण संस्था व शिक्षकबंधूंनी सरकारला या बाबतीत संपूर्ण सहकार्य देणे जरूर आहे.

आजवर महाराष्ट्राने शैक्षणिक बाबतींत नेहमीच आदर्शवत् कामगिरी केलेली आहे. यापुढेही महाराष्ट्रातील सर्व शिक्षण संस्था व शिक्षकवर्ग मुख्यमंत्री व शिक्षण-मंत्र्यांना याबाबत हार्दिक सहकार्य देऊन तो पूर्वलौकिक केवळ कायम ठेवण्यातच संतुष्टता मानणार नाहीत; तर त्यात अधिक मोलाची भर घालण्याची पराकाष्ठा करतील, असा आम्हांला विश्वास वाटतो.

'इन्क्लाब' (मुंबई) १–४–६७

## ☐ बँकांत माकडे :

नाण्यांचा खरेखोटेपणा आजवर लोहचुंबकाद्वारे अजमावण्यात येत असे; परंतु या कामासाठी आता माकडांचाही वापर करण्यात येतो, हे तुम्हांला माहीत आहे काय?

या कामासाठी सयाम येथील काही बँकांमधून माकडे ठेवलेली आहेत. ही माकडे नाणी तोंडात घेऊन दाताने चावून पाहतात. जे नाणं खरं असेल ते कॅशबॉक्समध्ये टाकतात आणि खोटं नाणं चावूनचावून खराब करतात व जमिनीवर टाकून देतात !

## ☐ कुसुमाला वरणाऱ्या कामिनी !

बडोद्याच्या जवळपास राहणाऱ्या एका वन्य जमातींतील तरुणी वर्षातून फक्त एका विशिष्ट दिवशीच लग्न करू शकतात ! त्या विशिष्ट दिवशी विवाह करू इच्छिणाऱ्या तरुणींचे लग्न नुकत्याच उमललेल्या ताज्यातवान्या फुलांच्या गुच्छांशी लावण्यात येते ! त्या गुच्छांतील फुले कोमेजल्यानंतर त्या 'विधवा' मानल्या जातात ! तथापि या तथाकथित विधवांना नंतर रीतसर लग्न लावता येते; अर्थात् हाडामांसाच्या सर्वसामान्य पुरुषाशी–पुष्पाशी नव्हे ! !

'उर्दू अखबार' (पुणे) २४–३–६७


## ☐ शर्मिला व इस्लाम

सुप्रसिद्ध सिनेतारका शर्मिला टागोरने एका साप्ताहिकाच्या प्रतिनिधीला खास मुलाखत देताना म्हटले, " इस्लाम धर्माची तत्त्वे मला फार आवडली. विशेषतः; भारतीय तत्त्वप्रणालीशी त्या तत्त्वांचे जे साम्य आहे, त्याने मी फार प्रभावित झाले अहिंसा, शांतता, सहिष्णू वृत्ती...इ. तत्त्वांचा माझ्यावर फार प्रभाव पडला..." आपण इस्लाम धर्म का स्वीकारला, यासंबंधी शर्मिलाचे हे समर्थन तिच्यासारखेच 'गोड गोड' आहे; कारण कुठलाही कलावंत किंवा खेळाडू धर्मबिर्म जाणत नसतो, हे तिला पक्के ठाऊक आहे !

वस्तुस्थिती अशी आहे की, तिने इस्लाम धर्म स्वीकारल्याचे निदर्शक समजला जाणारा 'कलमा' पढल्यानंतर तिच्याशी पतौडीच्या नबाबाने वाङनिश्चय केला ! यावरुन 'अंदरकी बात' काय आहे, हे चतुर वाचकांनी ओळखलेच असेल !

'कहकशा' ( सिने साप्ता. मुंबई )

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**

ता. १५ ते २१ एप्रिल १९६७

**मेष :** रवि-मंगळ प्रतियोगामुळे हा काल अधिकच उग्र व स्फोटक जाणवू लागेल. केवळ व्यक्तीवरच नव्हे तर अखिल वातावरणावरही याचे पडसाद उमटायला लागतील. एप्रिलच्या मध्यकाली रेल्वे अपघात, विमानांचे धोके, वाहनांची पडझड असले प्रकार निर्माण होण्याची बरीच शक्यता आहे. आपणही या वेळी फारच जपून वागायला हवे.

मतभेद, मानसिक त्रास, शत्रूंची कारस्थाने इत्यादी अनेक प्रकारांना आपणांस तोंड द्यावे लागेल. अशा वेळी एकच एक उपाय : मौन व सहनशीलता. 'फट म्हणता ब्रह्महत्या' असले काही चमत्कारिक प्रकार या वेळी अनुभवावे लागतील. मुख्यतः प्रकृतीला जपा आणि वादविवादापासून सतत चार हात दूरच राहा.

दि. १९ ते २१ तुमचे प्रयत्न या वेळी यशस्वी ठरावेत.

**वृषभ :** सूर्य व्ययात आणि त्याला मंगळाचा तीव्र विरोध. या आत्यंतिक अनिष्ट काळी काहीही न करण्यासारखा शहाणपणा नाही. देण्या-घेण्याच्या व्यवहारात तर हातोहात बनवले जाल. व्यापार-धंद्यात अशी ठोकर बसेल की, त्याचे परिणाम पुढे कित्येक दिवस सहन करावे लागतील.

असे असूनही या वेळी काही कामे

अनिच्छेने करावीच लागतील. व्यावहारिक कामांसाठी प्रवास घडेल. थोरांचा मान राखण्यासाठी सामाजिक क्षेत्रात उतरावे लागेल. राजकीय क्षेत्रात तर पदोपदी मतभेदांच्या ठिणग्या उडायला लागतील. या वेळी विशेष जपा, प्रतिष्ठेला आणि पैशाला.

दि. १८ ते २० या काळी काही अनुकूल लाभदायक गोष्टी घडाव्यात.

**मिथुन** : एकादशांत सूर्य–राहू. धनस्थानी उच्च गुरू. कित्येक वर्षांनंतर इतकी चांगली ग्रहस्थिती तुमच्या वाट्यास आलेली आहे.

या वेळी मोठ्या निर्धाराने कार्यप्रवृत्त झालात तर विक्रमी यश तुमच्या पदरी पडेल. नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे फार मोठे लाभ पदरी पडतील तर राजकीय वर्तुळात तुमच्या शब्दाला भलतेच महत्त्व चढेल.

कला-ग्रंथलेखन-नाट्य इत्यादी क्षेत्रांत तर तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही. तुमचे यश निरपवाद असल्याचे सिद्ध होईल.

मंगळ वक्री अवस्थेने चतुर्थात प्रवेश करणार असल्यामुळे कौटुंबिक वातावरण काही काल दूषित बनेल. तेवढी बाजू सोडली तर हे दिवस संस्मरणीय प्रगतीचे ठरावेत.

दि. १८ ते २० या काळी अनपेक्षित लाभ पदरी पडतील.

**कर्क** : चौथ्या मंगळाने आपले प्रस्थान तृतीयस्थानी ठेवण्याचे ठरविल्याने (दि. १९) काही दिवस आपणांस स्वास्थ्य लाभू लागेल.

अनारोग्य निवळू लागेल. स्थावराच्या विवंचना मिटू लागतील आणि नोकरी-धंद्यातील पेचप्रसंग सुटण्याची लक्षणे दिसायला लागतील. या आठवड्याचा उत्तर-काल बराच उत्साहाचा-प्रगतीचा ठरावा. नवे कार्यक्रम आखण्यात गढले जाल. आजवर सतत चुकणारे वेळापत्रक आता चुकू शकणार नाही. बरीचशी कामे गती घेऊ लागतील. वाहनांची अपेक्षा सफल होईल. वैज्ञानिक-वद्यकीय क्षेत्रांत संशोधना-त्मक कार्य करण्याची संधी लाभेल. प्रवास वरचेवर घडू लागतील.

दि. १८ ते २० विशेष अनुकूल काळ.

**सिंह** : या वेळी अनेक ग्रह भाग्यस्थानातून संचारत आहेत. या वेळी गुरु-शनीची अनुकूलता नाही याची मुळीच खंत बाळगू नका. सूर्य तुमचे मुख्य दैवत. तो उच्च आणि भाग्यस्थानी. एवढा एक योगही तुमच्या प्रगतीच्या मार्गातील साऱ्या विवंचना मिटवण्यास समर्थ ठरेल.

आता तुमची पावले प्रगतीकडे पडू लागलेली आहेत. माघार घेणे, रेंगाळत राहणे, कच खाणे हे सारे प्रकार आपण आता विसरू शकता. तुमच्या आजवरच्या खडतर तपस्येचे फल आता येथूनच आपणांस मिळायला लागेल.

एकाएकी बदल-स्थानांतर घडेल. आणि त्या स्थानांतरामुळेच तुमच्या प्रगतीच मार्ग निर्वेध बनेल.

दि. १५ ते १८ या काळावर लक्ष केंद्रित करा.

**कन्या :** एका बाजूने शारीरिक, मानसिक त्रासाचे प्रकार, तर दुसऱ्या बाजूने व्यावसायिक, राजकीय परमोत्कर्षाचा काल, अशी परस्परविरोधी द्विधा प्रवृत्ती या काली जाणवायला लागतील. अर्थात या वेळची अनिष्टता ही क्षणकालाचीच ठरेल.

अकराव्या गुरूचे देणे चिरंतन कल्याणाचे असते. प्रामुख्याने राजकीय वातावरणात जर आपण भाग घेतलेला असेल तर नजीकच्या भविष्यकालात फार मोठे अधिकाराचे, जबाबदारीचे स्थान आपणांस लाभेल आणि त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी बनेल. पण मंगळ वक्री असेपर्यंत आपणांस अनेक विरोधकांशी सतत झुंजावे लागेल. सांपत्तिक योग मात्र इतक्यातच सुधारण्याची आशा कमी.

दि. १७ ते २० या कालाची प्रामुख्याने नोंद करा.

**तूळ :** या वेळचा सूर्य-मंगळ प्रतियोग म्हणजे अगदी हातघाईचा प्रसंग. व्यावसायिक संघर्ष पेटेल, इष्टमित्रांशी मतभेद वाढू लागतील, कौटुंबिक क्षेत्रही अप्रसन्न जाणवू लागेल. थोरांच्या सहकार्याने आणि अविश्रांत परिश्रमाने या वेळचा पेचप्रसंग सोडवू शकाल. कामांचे अनंत डोंगर उपसावे लागतील, वेळापत्रक चुकू नये म्हणून जिवाचे रान करावे लागेल. अशा या निराशाजनक कालाच्या वेळीच तुमची जिद्द जागी होईल, निर्धाराने पाऊल पुढे पडेल. तुमच्यातील दुर्दम्य आशावादच या वेळी तुम्हांला तारून नेईल. प्रवासाचे टाळा आणि वाढत्या खर्चाला आळा घाला.

दि. १९ ते २१ या काली तुमच्या परिश्रमांचे श्रेय पदरी पडेल.

**वृश्चिक :** या वेळचे वातावरण अनुकूल दिसत असले तरी कोणत्याही क्षणी स्फोट होईल असे स्फोटकही आहे. हितशत्रूंच्या गुप्त कारस्थानांना रंग चढेल, तुमच्या अधिकाराच्या स्थानाला सुरुंग लावण्याचाही ते प्रयत्न करतील. त्यांच्या प्रयत्नाला यश येणार नाहीच; पण सतत जागरूक राहायला हवे. वक्री मंगळ राश्यंतर करण्याच्या सुमारास अशा प्रकारांना फारच ऊत येत असतो.

सुदैवाने गुरू तुमच्या भाग्यस्थानी असल्यामुळे तो डोळ्यांत तेल घालून तुमचे संरक्षण करीत राहील. कोणतेही नवे कार्य करण्यापूर्वी दहा वेळा विचार करा आणि थोरांचा सल्ला घ्या. या वेळी आपल्या हातून थोडी जरी चूक घडली तरी ती क्षम्य समजली जाणार नाही.

दि. १९–२० पासून आशादायक वातावरण दिसू लागेल.

**धनू :** चौथ्या शनीला-दशमांतील मंगळाचा तीव्र विरोध होणार आहे (दि. १९ पासून) अशा वेळी आपणांस प्रत्येक पाऊल विचाराने टाकावे लागेल. आखीव वेळापत्रक चुकेल, अंदाजपत्रक साफ कोलमडेल.

प्रकृती आणि परिस्थिती काहीशी दूषित बनण्याचा संभव आहे. अशा वेळी वाटेल तसे वागणे आणि मनाला येईल तसे करणे ग्रहांना मुळीच मंजूर नाही.

राहत्या जागेचा प्रश्न चिघळेल, इष्टमित्र, स्नेहीसोबती, शेजारीपाजारी बंड करून उठतील आणि त्यामुळे स्वस्थ बसण्याखेरीज गत्यंतर नाही, असं कचखाऊ मन बनेल. या वेळी प्रकृतीला जपा.

दि. २०–२१ पासून घाईगर्दीचे कार्यक्रम पार पाडावे लागतील.

**मकर :** या वेळी मकरराशी व्यक्तीच फक्त राजकीय वातावरणात मुक्त संचार करू लागतील. त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि माहात्म्य या वेळी खूपच वाढेल.

पण या वेळच्या ग्रहस्थितीचे पैसा देणे हे ध्येय नसून आजवर कधी कुणाला न मिळालेली प्रतिष्ठा मिळवून देणे हाच एक हेतू आहे.

दूरचा–कदाचित् परप्रांतीय–प्रवास घडेल. यांत्रिक-रासायनिक व्यवहार, क्षेत्र उभारले जाईल आणि त्याला अनेकांचे सक्रीय साहाय्याही लाभल.

मंगळ भाग्यस्थानी आल्यानंतरच आपल्या साऱ्या योजना गती घेऊ लागतील. दिव्य आणि भव्य असे काही करून दाखवावे, हीच त्या भाग्यस्थ मंगळाची मनिषा आहे.

दि. १९ ते २१ या कालाकडे विशेष लक्ष द्या.

**कुंभ :** गेल्या आठवड्यापासून आपण प्रगतिपथावरच आहात. या वेळी तुमच्या प्रगतीचा वेग खूपच वाढेल. दि. १५ ला रवि-मंगळ योग होताच अनपेक्षितपणे स्थानांतर-स्थित्यंतर घडेल आणि त्यामुळे एक नवे क्षेत्र गवसेल. त्या क्षेत्रात आपले कर्तृत्व उफाळून येईल. या वेळी राजकीय आखाड्यात उतरलेल्या व्यक्तींनाही प्रतिस्पर्ध्यांवर नेत्रदीपक विजय मिळवता येईल.

शैक्षणिक-वैज्ञानिक क्षेत्रांतही तुमचे महत्त्व खूपच वाढेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. अपेक्षित यश लाभेल.

दि. १७ ते १९ या काळी अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी घडाव्यात.

**मीन :** हा आठवडा काहीसा स्वास्थ्याचा जाणवला तरी संपूर्ण स्वास्थ्याचा नव्हेच. काही ना काही गुप्त कटकटी मनाला टोचत राहतील. सांसारिक वातावरण काहीसे अप्रसन्नच जाणवेल.

पण पंचमातील गुरुला आजवर तुमच्याकरता काही भरीव कार्य करण्याची संधी मिळाली नव्हती, ती आता मिळेल.

घसरलेला धंदा सुधारू लागेल, हुकलेल्या संधी पुन्हा दिसू लागतील, हातचे गेलेले प्रगतीचे स्थान पुन्हा लाभू शकेल अशी लक्षणे दिसू लागतील. तात्पर्य, येथून पुढे आपली पावले प्रगतीकडे पडायला लागतील.

दि. १८–१९–२० मध्येच सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

●

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ खालाल न विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या

हल्लीच्या जगातला एक मोठा उद्योग म्हणजे निरनिराळ्या चांभार–चौकशा करणारे फॉर्म्स भरून पाठवणे. कोणाला कुठल्या गोष्टीसाठी कुठल्या प्रश्नांचा फॉर्म भरून पाठवावा लागेल हे सांगणे हल्ली महामुष्कील होऊन बसले आहे. पूर्वी ज्ञान मिळविण्याचे दोन मार्ग होते. परिप्रश्नेन सेवया. आता मास्तरांची, भाजी मंडईतून आणून देण्यासारखी माफक सेवा सोडली तर सगळा भर परिप्रश्नावर दिसतो. आणि केवळ आपल्याकडची जिज्ञासू मंडळीच प्रश्नचिन्हांनी ग्रासली आहेत असे नाही, तर ज्ञान–विज्ञानाच्या आघाडीवर असलेल्या पश्चिमेतही हीच स्थिती आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाचा एक प्राध्यापक तर विद्यार्थी–मंडळाच्या निरनिराळ्या प्रश्नपत्रिकांनी इतका भंडावून गेला की अखेर त्याने सूड उगविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या नियतकालिकात एक लेख लिहून त्यात बरेच विचारू नयेत, असे प्रश्न विचारले. त्यात एक प्रश्न असा होता. तुम्ही कोणत्या पद्धतीची केशरचना करता? तुमचे केस खाली कशावर येतात ?– अ. तुमचे कान, ब. तुमचे कपाळ, क. तुमचा सबंध चेहरा. वरीलपैकी दोन प्रश्नांचे उत्तर होय असेल तर तुमचा या केशरचनेतला हेतू तुम्हांला अ. माहीत आहे ? ब. माहीत नाही ? जर 'अ' चे उत्तर होय असेल तर तुमचा हेतू काय आहे ?– अ. सुंदर दिसणे. ब. इतके घाणेरडे दिसणे की लोकांनी तुमच्याकडे मुद्दाम पाहावे. क. तुमच्या 'दमदारपणा' ची ग्वाही देणे. ड. मोठ्या मंडळींच्या कपाळाला आठ्या पाडणे.

छान ! आपल्याकडे तर बऱ्याच निरनिराळ्या मंडळींना असले फॉर्म पाठवून सांगता येईल. खालील न विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या ! काही नमुनेच द्यायचे झाले तर......आधुनिक तरुणी : १. तुमची सलवार–कमीज एक नूर आदमी पाव नूर कपडा अशी नवीन म्हण प्रचलित करण्यासाठी असते काय ? असल्यास या म्हणीचे सुगम इंग्रजीत भाषांतर करा. नसल्यास शेरभर ढोबरी वांगी पावशेराच्या

पिशवीत कशी मावतात, हे स्पष्ट करा. २. तुमची केशरचना भूतदयेने प्रेरित होऊन पक्ष्यांनी घरटी बांधावीत म्हणून केलेली असते काय हे सांगा. उत्तर होय असल्यास पक्षी कुठला ?—अ. कावळा. ब. चिमणी. क. उनाड मैना. ड. हिंदी सिनेमातला पंछी, मंत्री : काळा बाजार व पांढरी टोपी यांच्या मधला विरोधविकासवाद स्पष्ट करा. परमेश्वर आणि परमिटेश्वर यांच्यांत अधिक सर्वशक्तिमान् कोण, याचे उत्तर द्या. मासिकाचा संपादक : अर्धवट कपडे घातलेली (किंवा काढलेली) हेर तरुणी आणि देमार पिस्तुलबाजीचे कथानक असलेल्या इंग्रजी चित्रपटाची कथा सचित्र सांगितल्याशिवाय रसही गळणार नाही व रंगही चढणार नाही हे शाश्वत तत्त्व संपादकांच्या ज्या मूळ—पुरुषाने प्रथम मांडले त्याचे नाव सांगा. विज्ञानापासून शेतीपर्यंत कुठल्या प्रकारच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर कुठल्या नटीचे चित्र हवे याची शास्त्रीय चर्चा करा.

## □ लायब्ररीत ठेवलेला सौंदर्याचा खजिना

हल्ली कुठलीही गोष्ट लांब, रुंद, उंच किंवा खोल असावी लागते. अमेरिकेत असताना अस्मादिक ज्या गावात राहिले तेथल्या कालव्यावर एक बराच रुंद पण तितकाच आखूड पूल होता. झाले, माझा प्रत्येक अमेरिकन सोबती मला कटाक्षाने सांगत होता—"हा जगातला सर्वांत रुंद पूल बरं का!" मला वाटायचे हा जगातला सर्वांत आखूड पूलही असावा; अर्थात् ही नामुष्कीची गोष्ट सांगायला माझे अमेरिकन नेमके विसरायचे. हे तर काहीच नाही! मी अमेरिकेत एक "जगातले सर्वांत मोठे कचऱ्याच्या टोपल्यांचे दुकान" देखील पाहिले. ती पाटी पाहून प्रथम तर मी सर्दच झालो, पण नंतर मनात विचार आला, जगातला सर्वांत मोठा कचरा अमेरिकेत असला पाहिजे, नाही तर जगातल्या सर्वांत मोठ्या कचऱ्याच्या टोपल्यांच्या दुकानाची अमेरिकेला आवश्यकता का वाटावी ?

बरं, कोण "सर्वांत" काय पाहिजे यालाही काही नियम दिसत नाही. जगातले सर्वांत सुगंधी फूल, सर्वांत उंच डोंगर, सर्वांत मोठे पोट, सर्वांत पोकळ आश्वासन, या कल्पना समजू शकतात; पण ब्रिटनमध्ये म्हणे सर्वांत सुंदर ग्रंथपालिका शोधून काढण्यासाठी चढाओढ ठेवण्यात आली आहे. पाहिलेत ? लायब्ररीत ज्ञानाचे भांडार असते त्याच्या जोडीला सौंदर्याचा खजिनादेखील असावा लागतो हे माझ्यासारख्या पुस्तकातल्या किड्यालाही ठाऊक नव्हते. चांगली ग्रंथपालिका म्हणजे पुस्तके देण्या-घेण्यात हुशार असा सरळसोट अर्थ मी घतला असता. पण या चढाओढीतली ग्रंथ-पालिका निरक्षर असली तरी चालेल, दिसायला चांगली पाहिजे, चला, आपणही हिंदुस्थानात चढाओढी ठेवू या—सर्वांत ढेरपोटचा मंत्री, सर्वांत वाचाळ न्हावी, सर्वांत स्वस्त उपदेश, सर्वांत मस्त हिंदी सिनेमा......

●

# 'वासवदत्ता'

# निर्मितीमागील कथा

मुंबईच्या रंगभूमीचे एक फार मोठे वैशिष्टच म्हणजे इथे सदैव काही ना काही नवीन नवीन प्रयोग सादर होत असतात. आपापल्या कुवतीप्रमाणे, ज्ञानाप्रमाणे काही तरी वैशिष्टयपूर्ण गोष्टी सादर करण्यासाठी नवे नवे लोक धडपडत असतात. अशा कलाकारांत एका नव्या स्त्रीची भर पडत आहे त्यांचे नाव आहे सौ. मीना पेठे ! दिल्ली येथील 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' या शिक्षणसंस्थेत नाटयनिर्मिती (Drama Production) या विषयाचे खास शिक्षण घेऊन– विशेषत: त्यात पहिला क्रमांक मिळवून–दोन वर्षांपूर्वीच त्या मुंबईत आल्या आहेत. 'स्कूल ऑफ ड्रामा'मध्ये त्यांनी घेतलेले शिक्षण नाटय या विषयावर केलेला अभ्यास याचे दर्शनच जणू त्या आपल्या 'वासवदत्ता' या नाटकाद्वारे घडविणार आहेत.

वास्तविक त्यांना मुंबईत येऊन दोन वर्षे झाली. या एवढ्या अवधीत त्यांनी यापूर्वी कसलेही प्रयत्न का केले नाहीत, असे विचारता त्या म्हणाल्या, "मुंबईत आल्या दिवसापासून मला काम करण्याची संधी द्या, अशी विनंती करण्यासाठी मी हौशी, व्यावसायिक नाटयसंस्थांच्या दारात एक–दोनदाच नव्हे तर अनेक वेळा गेले, एवढेच काय, पण मला कसलाही मोबदला न देता माझ्याकडून काम करून घ्या म्हणूनही विनंती केली ! पण एक ललितकलादर्श सोडली तर दुर्दैवाने दुसऱ्या एकाही संस्थेने मला काम करण्याची संधी दिली नाही. (ललितकलादर्शच्या 'जयजयगौरी शंकर'मध्ये दीपयोजनेची जबाबदारी माझ्यावर सोपविलेली होती.) ही संधी न देण्याचे कारण काय, काही कळत नाही. कदाचित 'स्कूल ऑफ ड्रामा'-सारख्या नवनाटय तंत्राचा पुरस्कार करणाऱ्या संस्थेत मी शिक्षण घेतले असल्याने नवनाटयाची भीती वाटणारे, चीड असणारे ते लोक माझ्या प्रयत्नांविषयी साशंक असावेत. काहीही असो. मला संधी मिळाली नाही एवढे खरे !

### 'शिवाई कला दर्शन'

"तसं पाहू गेलं तर मुंबईच्या रंगभूमीवर नवनाटयतंत्रातील प्रयोग होत नाहीत असेही नाही. ४–६ हुशार, कल्पक कलाकार असे प्रयोग सादर करतातही; पण त्यांचे नशीब असे थोर की त्यांच्यामागे मोठमोठ्या संस्थांचे पाठबळ आहे. ते म्हणतील त्या, म्हणतील तशा गोष्टी करून पाहण्याची त्यांना मुभा असते. हे भाग्य माझ्या वाट्याला आले नाही. सतत दोन वर्षे मी दार ठोठावूनही काही उपयोग झाला

नाही. मी एकटीच विविध कल्पना मनाशी जुळवीत बसे. त्या प्रत्यक्षात येण्याचा मार्ग मात्र सापडत नव्हता. अखेर माझ्या एका स्नेह्याला एक कल्पना सुचली. 'तुला जर कुणी कामाची संधी देत नसेल तर तूच स्वतःची संस्था स्थापन का करीत नाहीस ?' त्यांची कल्पना मात्र बेहद्द पसंत पडली असली तरी ती प्रत्यक्षात कशी यावी ? कोणत्याही संस्थेचे पाठबळ नसताना नव्या नव्या कल्पना सादर करून, कोणतेही नवे नाटक सादर करायचे म्हणजे पैसा किती लागेल ? तो कोण देणार ? या विचारात बरेच दिवस गेले. एक दिवस माझे पती श्री. पेठे यांना माझा विचार सांगून पाहिला. त्यांच्याकडून मात्र अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. नाटकासाठी लागणारा सारा पैसा द्यायला ते तयार होते, पण एका अटीवर. ती म्हणजे हा प्रयत्न फसलाच तर पुन्हा नव्या नाटकाचे नाव म्हणून काढायचे नाहीच. पण घरातही अमूक एक गोष्ट घ्या, तमूक सोयी करा अशी मागणी करायची नाही. साऱ्या गोष्टींवरचा हक्क हे पैसे घेतल्यावर नष्ट होणार होता. बरं, सुदैवाने नाटक चाललेच तर त्यातील फायद्याची अपेक्षाही त्यांना नव्हती. त्यांचे भांडवल परत करून उरलेल्या पैशांतून मी वाटल्यास नवे नाटक काढावे. त्यांच्या दृष्टीने एकदा दिलेले पैसे वायाच गेल्यासारखे होते. कोणत्याही अटीवर का होईना, मला पैसे मिळणार हा आनंद फार मोठा होता. मी अटी मान्य करून मोठ्या हुरूपाने कामाला लागले.

माझ्या संस्थेचे नाव ठेवले 'शिवाई कला दर्शन.' आता नाटक कोणते निवडायचे ? ही तर पहिली कसोटी ! ! नव्या लोकप्रिय नाटककारांची नावे डोळ्यापुढे आली पण मला संपूर्णतया नवीन असलेल्या नाटकावर विचार करण्याऐवजी मी 'स्कूल ऑफ ड्रामा' मध्ये अंतिम परीक्षेसाठी निवडलेल्या 'स्वप्नवासवदत्ता' या संस्कृत नाटकावरूनच एखादे मराठी नाटक सादर करावे असा विचार केला. या कथेवर मराठीत नाटक झाले आहे किंवा काय असा शोध घेऊ लागले, तेव्हा एकूण सहा नाटके मला वाचायला मिळाली. शुभारंभ तर छान झाला ! या सहांमधील माझ्या कल्पनेबरहुकूम बसणारे मला काही केल्याचे समाधान लाभणार होते असे वसू भगत यांचे नाटक मी निश्चित केले. आणि गेले तीन महिने तरी त्यावर तालमी करीत आहे."

"हे नाटक तर संपूर्णतया नवनाट्य तंत्रात सादर होणार असेल ?" मी प्रश्न केला, त्यावर त्या उखडल्या, "छे: छे: चुकीची समजूत आहे. मी अल्काझींच्या स्कूलची विद्यार्थिनी असल्याने तुम्हांला तसे वाटत असेल; पण आपल्या मराठी रंगभूमीला नवतंत्र अजूनही पचत नाही, हे मी पूर्णपणे जाणून आहे; म्हणून हे नाटक अगदी जुन्याच तंत्रात सादर होईल. क्वचित कधी नवतंत्राचा वापर करीन, पण त्या साऱ्या गोष्टी लोकांना पटणाऱ्या असतील, रंगतीत भर घालणाऱ्या ठरतील, हे पाहिले आहे."

"मग तुम्हांला नवे असे काय दाखविता येणार ?" — "का ? भरपूर संधी आहे. आम्ही सादर करणारे एकवेळ कमी पडू पण कल्पनांची वाण पडणार नाही. आता हेच पाहा ना, मी सतत चार वर्षे या नाटकावर विचार करीत आहे. या संबंधांत जेवढे काही वाचता येईल, जे काही अभ्यासता येईल तेवढे सारे मनात साठवून ठेवले आहे. इतक्या विविध कल्पना मनात दाटल्या आहेत की, त्यांतील सादर तरी किती करू, असे होऊन जाते; पण मलाही काही मर्यादा आहेत, खर्चाचा विचार तर सदैव येतो. कोणत्याही संस्थेचे पाठबळ नसल्याकारणाने नाटकाला लागणारी बारीक सारीक गोष्टही मला स्वतःला विकत घ्यावी लागली आहे. तरीही त्या अडचणींचा विचार न करता जास्तीत जास्त काय देता येईल, हे मी पाहणार आहे. एवढे नक्की की, मी जे काही सादर करीन तो एक वेगळा प्रयत्न असेल, त्यात वेगळी दृष्टी आहे एवढे कुणीही कबूल करील.

"कपडे, दागदागिने, नेपथ्य, या साऱ्या गोष्टी नवीनच होणार असल्या तरी त्यातून तत्कालीन संस्कृतीचे हुबेहूब दर्शन घडविण्याचा प्रयत्नही मी करणार आहे. साहजिकच तडजोड, भागवाभागवीचा प्रकार मुळीच दिसणार नाही हे निश्चित!"

## वन वूमन शो

"या कामात तुम्ही कुणाची मदत वगैरे घेतलीत का ?"

—"म्हटलं तर मला साऱ्यांची मदत होत आहे, म्हटलं तर मी एकटीच सारी धावाधाव करीत आहे. पण मी कुणावर अवलंबूनही राहिलेली नाही. साऱ्या गोष्टी अगदी थिएटरच्या तारखा, जाहिरात, नेपथ्य, कपडेपट पाहण्यापासून ते थेट तालमी घेण्यापर्यंत साऱ्या गोष्टी मी स्वतःच करीत असते.

"योगायोग म्हणा किंवा अन्य काही म्हणा, नाटकात काम करणारे कलाकारही माझ्यासारखेच जिद्दी, काही तरी करून दाखविण्यास उत्सुक असलेले आहेत. सौ. सुहासिनी मुळगावकर यांच्यासारखी प्रसिद्ध कलाकार प्रथमच माझ्या नाटका-मुळे संयुक्त प्रयोगात भूमिका करीत आहे. तिच्या गान–अभिनय कौशल्याबद्दल मी मुद्दाम सांगायलाच पाहिजे असे नाही. संगीतासाठी जितेंद्र अभिषेकींसारखा नावाज-लेला कल्पक, बुद्धिमान संगीतकार मला मिळाला आहे तर शांता शेळके यांच्या-सारखी प्रसिद्ध कवयित्री प्रथम माझ्या नाटकाच्या निमित्ताने नाट्यपदे लिहीत आहे. नायकाचे काम करण्यासाठी कुणाची निवड करायची हा प्रश्नच होता!

संगीत व अभिनय या दोनही दृष्टींनी तो दर्जेदार असायला हवा. त्यातून सुहासिनींच्या बरोबर उभे राहायचे म्हणजे सोपे काम नाही ! सध्याच्या लोकप्रिय गायक नटां-ऐवजी नवाच नट उभा केला तर? हा विचार करून चक्क वृत्तपत्रांतून तशी जाहिरात दिली. महाराष्ट्रातून सुमारे वीसपेक्षा अधिक गायक कलाकारांचे अर्ज आले. त्यांतील तीन–चारजण तर अप्रतीम होते. पण त्या प्रत्येकाच्या काही ना काही अडचणींमुळे ते भरपूर तालमी देऊ शकत नव्हते. अखेर पिळगावकर यांच्या-सारखा हुशार, मेहनती कलाकार मिळाला. त्याचा गाण्याचा थोडाफार अभ्यास होता. त्या जोरावर त्याच्याकडून तयारी करून घेण्याचे आश्वासन अभिषेकींनी, दिले. अभिनयाची जबाबदारी मी स्वीकारली. पाहू या स्वारी काय करते ते ! मला समाधान एवढेच की, माझ्या या नाटकाने एका गायक कलाकारास पुढे येण्याची संधी मिळणार आहे. "

—" तुमच्या दृष्टीने नाटकातील खास आवर्जून उल्लेख करावा अशी वैशिष्टये कोणती ? "

—" माझ्या बोलण्याचा विपर्यास होणार नसेल तर अत्यंत नम्रपणाने मी एव-ढेच सांगू शकेन की, या नाटकांत सादर होणारी प्रत्येक गोष्ट लोकांनी बारकाईने, चोखंदळपणाने पारखून घ्यावी. नाटकाचा सेट, कपडे, दागदागिने, स्टेजची इतर प्रॉपर्टी, स्त्रियांची केशरचना या साऱ्या गोष्टींवर मी अतोनात मेहनत घेतली आहे एवढे म्हटले म्हणजे पुरे ! अभिनयाच्या बाबतीतही असेच ! सतत दोन–अडीच महिने तालमी घेतल्या आहेत. आता ऐन वेळी कलाकार मंडळी काय करतात पाहू. पण मला विश्वास आहे, प्रत्येकजण मला यशच देईल ! "

स्वतःच्या नाटकावर अपार मेहनत घेत असलेल्या जणू आपले सर्वस्व पणाला लावून उभ्या राहिलेल्या सौ. मीना पेठे यांच्या प्रयत्नांचे कौतुक वाटल्याखेरीज कसे राहील ! त्यांनी बाळगलेली जिद्दही विचारात घेण्याजोगी आहे. बरं, एवढंही करून आपण काही फार मोठे काम करणार आहोत, असाही त्यांचा दावा नाही हे विशेष ! जे शिकलो ते प्रत्यक्षात आणायला मिळणार हाच आनंद अधिक ! नाटकाच्या निर्मितीसाठी खर्च केलेले पैसे दुर्दैवाने बुडालेच तर आयुष्यात एक हौस तरी केली असे मानण्याचीही त्यांची तयारी आहे; आणि सुदैवाने काही फायदा झालाच तर त्यातूनही आणखी काही सादर करण्याची इच्छा आहे. धंदेवाईक संस्थांप्रमाणे जास्तीत जास्त पैसा कसा ओढता येईल हे पाहण्याचीही त्यांची वृत्ती नाही. पैसा मिळाला तर हवा आहे, पण तो पुढच्या प्रयत्नांसाठी. त्यावाचून त्यांचा संसार खोळंबला आहे, असे मुळीच नाही.

असा हा प्रयत्न, ही धडपड यशस्वी होईल न होईल हे आज जरी निश्चितपणाने सांगता आले नाही तरी त्यासाठी सौ. मीना पेठे यांनी बाळगलेली जिद्द निश्चितच अभिनंदनीय; नव्हे, अनुकरणीय आहे. ●

# अ फ सा ना

## अ सं भा व्य . . . . अ त र्क्य

पडद्यावर दिग्दर्शक–ब्रिज ही टायटल दृश्यमान होते आणि आपली स्मृती भूतकाळात हरवते–आणि दृष्टी खिळते–' बीस साल बाद ' या अक्षरांवर. चित्रपटगृहातील खुर्चीत आपण थोडेसे पुढे सरकतो. अपेक्षेनं. उत्सुकतेनं. ' बीस साल बाद ' च्या परंपरेतला एखादा उत्कृष्ट सस्पेन्स चित्रपट आता पाहायला मिळणार म्हणून !...त्याच वेळी रजतपटावर अशोककुमार दिसतो–बेछुट, बेडर व काहीशा बेरड कैद्याच्या वेषात ! त्याचं बेदरकार बोलणं व बेगुमान वागणं पाहत असतानाच ' टायटल्स् ' सुरू होतात आणि अभावितपणे आपल्या मुखातून उद्‌गार निघतात–" ओह ! स्प्लेंडिड ! केवढा परिणामकारक प्रारंभ ! "

**कथा फसते, प्रेक्षकही फसतो !**

एका जेलमधून दुसऱ्या जेलमध्ये नेत असता गोपाळ (अशोककुमार) हा अट्टल गुन्हेगार कैदी पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन पळून जातो. अरण्यातून जात असताना शिकारी शेखरची त्याला गोळी लागते. उपचारार्थ म्हणून शेखर त्याला जंगलातील आपल्या बंगल्यात आणतो. शेखर आपल्या पत्नीच्या प्रतारणेने घायाळ झाल्यामुळे स्त्री-द्वेष्टा बनलेला असतो.

पोलिसांच्या नजरेपासून स्वतःचे रक्षणाच्या दृष्टीनं शेखरचा हा जंगलातला बंगला चांगला आहे, हे उमजून गोपाळ स्वतःही स्त्री-द्वेष्टा असल्याचा बहाणा करतो आणि त्याच्या घरी कायमचे बस्तान ठोकतो. पुढे एके दिवशी घरून पळून आलेली एक मुलगी ओढयाला पाणी आल्याने शेखरच्या आश्रयार्थ येते. प्रथम तो आश्रय देत नाही, परंतु गोपाळ तिला गुपचूप आश्रय देतो. एवढेच नव्हे तर तिला बजावतो की, आपला आश्रयदाता–शेखर–दुःखी आहे. त्याचं दुःख दूर कर ! त्याच्यावर प्रेम कर ! झालं. त्या मुलीला कोणावर तरी प्रेम करायचंच असतं. ती तयार होते. पण प्रथम शेखर बधत नाही. गोपाळ नाना क्लृप्त्या लढवून दोघांना एकत्र आणतो. लग्नापूर्वी शेखर ' रेणू ' ला आपली पूर्वकथा सांगतो. ऐन वेळी तिचे आईवडीलही येतात. तरी शेवटी त्यांचे लग्न लागतेच ! परंतु पहिल्याच रात्री शेखरची पूर्वाश्रमींची पत्नी प्रकटते ! ती अपघातात मेलेली नसते ! शेखरनं बेकायदेशीर दुसरं लग्न केल्याबद्दल ती त्याला ' ब्लॅकमेल ' करू लागते. २० लाखांची मागणी करते. त्यासाठी आपल्या प्रियकराच्या साहाय्याने जीपबरोबर

शेखरचा कडेलोट करण्याचाही कट ती रचते; परंतु ऐन वेळी शेखरचा आश्रित–मुका मुलगा–दगड मारतो आणि शेखरऐवजी त्याच्या पहिल्या पत्नीचा (हेलन) जीपबरोबर कडेलोट होतो ! त्याच्यावर तिच्या खुनाचा आरोप येतो.

कोर्टात खरा आरोपी येतो. मुका मुलगा त्याला तत्काळ ओळखतो. खटल्याला निराळं वळण लागतं. खऱ्या आरोपीच्या गुन्ह्याचा 'आय् विटनेस' असलेल्या मुक्या मुलाला खरा गुन्हेगार हस्तगत करतो. मध्यंतरी गोपाळला पोलिस पकडून नेतात. परंतु 'नेहमीप्रमाणे' तो पळून येतो. शेवटी खऱ्या गुन्हेगाराचा खून करून तो मुलाला वाचवतो व झटापटीत गोळ्या लागून स्वतःही मरतो ! इथे चित्रपट संपतो. प्रेक्षकांची सहनशीलता त्यापूर्वीच संपलेली असते !

## अफसाना, छेः धिंगाणा

'गोपाळ'सारख्या जातिवंत गुन्हेगाराचे अचानक हृदयपरिवर्तन घडावे, असे काय घडते ? रेणूशी तो स्वतः इतक्या अगत्याने वागतो, त्याच्यावर तिचे प्रेम जडत नाही, आणि तिचा विनाकारण तिरस्कार करणाऱ्या शेखरवर ती प्रेम करू लागते ! का ? तर गोपाळ सांगतो म्हणून ! 'मुहब्बत की नहीं जाती, हो जाती है ।' म्हणून प्रत्येक चित्रपटात टाहो फोडणारे हिंदी लेखक-दिग्दर्शक इथे एका पात्राकरवी हिरॉईनला चक्क हुकूम सोडतात– "हां ! कर ह्याच्यावर प्रेम !" प्रेम म्हणजे काय स्वयंपाक आहे ?

तसेच पहिली पत्नी जिवंत असता दुसरं लग्न केल्याबद्दल शेखरशी 'ब्लॅकमेल' करणाऱ्या आपल्या पहिल्या पत्नीला तो भीक घालतोच कशाला ? ती अपघातात मृत्यू पावल्याचे वृत्त पत्रांत फोटोसह छापून आलेले असते. मग त्याला त्याच्या आधारे आपले निर्दोषत्व सिद्ध करता आले नसते काय ?

खऱ्या गुन्हेगाराच्या हाती मुलगा आला असताही तो त्याला तत्काळ 'खतम्' करण्याऐवजी मोटारीत डांबून कोठे नेत असतो ?

पूर्वार्धात जबरदस्तीने मुलीचे लग्न लावावयास निघालेला बाप उत्तरार्धात तिने निवडलेल्या शेखरशी लग्न लावायला चटकन् परवानगी देतो, हे कसे ! आईचा विरोध दूर करण्यासाठी योजण्यात येणारा उपाय–असं काही प्रत्यक्ष समाजात तुम्ही कधी पाहिलंय् ? शक्यच नाही ! अहो, ह्या खास 'फिल्मी चीजा' आहेत !

## उडदामाजी काळेगोरे

अशोककुमारने अभिनीत केलेली 'गोपाळ'ची व्यक्तिरेखा मुळातच बेंगरूळ आहे. याच धर्तीच्या त्याच्या 'किस्मत', 'संग्राम' किंवा 'उस्ताद'मधील भूमिका खूपच उजव्या होत्या. इथं तो सराईतपणे वागतो, इतकंच. प्रदीपकुमार अजून 'ठोकळाच' राहिलेला आहे. पद्मिनीला अजून हिंदी अस्खलितपणे बोलता येत नाही. अभिनय-अभिव्यक्तीपेक्षा नृत्य हेच तिचे क्षेत्र. 'भाभी'फेम जगदीप मात्र सर्वांत उठून दिसतो.

हा चित्रपट पाहताना कैद्यांची समस्या यशस्वीरीत्या हाताळणाऱ्या "दो आँखें बारह हाथ'ची आवर्जून आठवण होते; परंतु एका विषयाव्यतिरिक्त उभयतांत काहीच साम्य नाही. 'दो आँखें' ची चमक वा धमक तर यात मुळीच नाही !

सचीन भौमिकच्या कथेत राम नाही ! 'ब्रिज' च्या दिग्दर्शनात कल्पकता नाही ! फक्त ईस्टमन कलरमधील अन्वर सिराज यांची फोटोग्राफी व चित्रगुप्त यांचे संगीत बरे आहे.

टिपणिसांच्या संपादनात खूपच दोष राहून गेले आहेत. 'कन्टिन्युटी' नीटपणे साधलेली नाही. शेखरच्या बंगल्यात आश्रयार्थ आलेली 'रेणू' रात्री दुसरी साडी नाही म्हणून त्याचा 'गाऊन' घालते आणि सकाळी चक्क नवी साडी नेसलेली दिसते ! लग्नाआधीच्या एका दृश्यातही पद्मिनीच्या गळयात मंगळसूत्र (रेणू) दिसते !

...किती आणि काय काय म्हणून सांगावं ? थोडक्यात—उडदामाजी काळेगोरे ! काय निवडावे निवडणाराने ?

**हिदायत खान**

●

प्रेयसी—आपला विवाह झाल्यानंतर मी तुम्हांला दुःखात व संकटात साथ देईन.

प्रियकर—पण मला कसलेही दुःख नाही व संकट येण्याची शक्यता नाही.

प्रेयसी—परंतु मी विवाह झाल्यानंतरचे सांगते आहे.

—अशोक आंग्रे.

वारंवार नावाचे बारसे करणारी

# विदेशी चित्रसृष्टी

नावाला इतकी नावे ठेवून झाली आहेत की, त्याबद्दल काही लिहावयाचे राहून गेलेले नाही. " नाव सोनूबाई... " ही म्हण आता केवळ ' वाक्प्रचार आणि म्हणी ' या पुस्तकात राहिली नसून व्यवहारात पदोपदी तिचा प्रत्यय येतो. कुसुमेशु असे (सु)कोमल नाव असलेल्या गृहस्थास भेटण्यास जावे आणि तो भीमगौंडा मलगौंडा बेळ्हळ्ळी या नावाला शोभणारा आडमाप गृहस्थ निघावा, असे वारंवार घडते. ' रजनी ' हे नाव ऐकताच एखाद्या कृशांगीची नाजुक काया आठवावी आणि प्रत्यक्षात मात्र एखादा काळा करंद घिप्पाड माणूस उभा ठाकतो. ' पल्लवी ' नाव धारण केलेली युवती गडकऱ्यांच्या ठकीचा मूर्तिमंत अवतार निघते. नावे ही अशी नेहमी फसवून जातात. या फसवेपणाच्या ' गुणाचा ' सिनेसृष्टीत फार चांगला उपयोग करून घेतला जातो. परदेशी चित्रपटांत तर या (फसव्या) नाममहिम्याला अत्यंत महत्त्व आहे.

चित्रपट पडतो किंवा चालतो का ? त्यातील नटांच्या अभिनयामुळे ? नटांचा अभिनय हा एक घटक असू शकेल; परंतु काही काही वेळा चित्रपटाचे नाव त्याचे नशीब ठरवते. अगदी सामान्य चित्र गोंडस नावामुळे धडाक्याने चालते तर एखादे दर्जेदार चित्र मिळमिळीत, नीरस नावामुळे कोसळते. परदेशी चित्रपटांचे वितरक, निर्माते तर या बाबीला फार महत्त्व देतात. लक्षात राहील असे आपल्या परीने वेगळे असणारे, गुंतागुंत निर्माण करणारे नाव चित्रपटाला देण्याकडे त्यांचा कल असतो. नाव कलात्मक, कर्णमधुर (पण सुस्ती न आणणारे), सूचक असावे आणि हे सारे करावयाचे असते अगदी मोजक्या शब्दांत !

चित्रपटांची नावे वाटेल तेव्हा बदलण्यात विदेशी चित्रपटसृष्टी आघाडीवर आहे. प्रेक्षकांना आकृष्ट करण्यासाठीच हा सगळा नाम नूतनीकरणाचा अट्टाहास असतो. अगदी अलीकडील चित्रपटांच्या नावांत करण्यात आलेला हा बदल पाहा– ' जॉय-हाऊस 'ला बदलून प्रेमाच्या पिंजऱ्यात (द लव्ह केज्) कोंडून टाकण्यात आले. ' द ग्रेट ब्रेन रॉबरी ' हे एवढे औत्सुक्य निर्माण करणारे नाव असूनही त्याचे ' द बिग जॉब ' असे नामकरण झाले. ' पॅसेज ऑफ लव्ह ' मधील प्रेम–मार्गावरून

प्रेक्षक येतील की नाही या शंकेमुळे त्याचे 'आय वॉज हॅपी हियर' असे साधे नाव ठेवण्यात आले.

'डॉ. गोल्डफूट अॅन्ड द सेक्स मशिन' या गमतीदार चित्रपटाने नावाच्या बाबतीत फारच बहार उडवून दिली. एका खरोखरीच्या डॉ. गोल्डफूटने या चित्रपटाच्या नावाबद्दल तक्रार गुदरली. त्यामळे चित्रपटाचे नाव बदलून 'डॉ. जी. अॅन्ड द बिकिनी मशिन' असे ठेवण्यात आले. खरं म्हणजे या चित्रपटाचे मूळ नाव होते 'डॉ. गोल्डफूट.' परंतु काही मसाला हवा म्हणून 'सेक्स मशिन'चा त्यात अंतर्भाव केला गेला. चित्रपटातील डॉक्टरच्या निर्देशामुळे ब्रिटनमधील डॉक्टर्स रागावतील की काय, असे वाटून 'प्रोफेसर गोल्डफूट अॅन्ड द बिकिनी मशिन' असाही बदल झाला. हे मशिनही सेक्स, गर्ल वरून शेवटी बिकिनीवर येऊन स्थिरावले.

मार्लन ब्रॅन्डो आणि यूल ब्रायनर यांचा 'मोरीटुरी' नावाचा चित्रपट नुकताच येऊन गेला. हा चित्रपट जेव्हा न्यूयॉर्कमध्ये प्रदर्शित झाला तेव्हा या विचित्र नावामुळे चित्रपट मुळीच चालेना. ९९ टक्के लोकांना या चमत्कारिक नावाचा काही अर्थबोधच होईना. ट्वेन्टिएथ सेंच्युरी फॉक्स या कंपनीच्या व्यवस्थापकांनी लक्षावधी डॉलर्स पाण्यासारखे खर्चून या चित्रपटाचे नाव बदलून टाकले. कोटयवधी पोस्टर्स पुन्हा छापण्यात आली. हजारो ब्लॉक्स नव्याने करण्यात आले; परंतु असे असूनही या चित्रपटाला फारशी गर्दी झाली नाहीच. कारण नवे नावही पूर्वीइतकेच, किंबहुना अधिक अनाकलनीय होते– 'मोरीटुरी' या नावाचा 'द सॅबोटचूर, कोड नेम मोरीटुरी' हा कंपनीने केलेला नवा अवतार तितकाच दुर्बोध नव्हे काय?

'व्हॉलपोन' या चित्रपटाचे २–३ वेळा बारसे करण्यात आले. प्रथम हे नाव बदलून 'द टेल ऑफ अ फॉक्स' करण्यात आले आणि त्यानंतर ते बनले 'एनीवन



यूल ब्रायनर आणि मार्लन ब्रॅंडो : 'मोरीटुरी' मध्ये

फॉर व्हेनीस ? ' आणि त्याचे अंतिम रूपांतर झाले ' द हनी पॉट ' या नावात.

एका युद्धचित्राचे आधी नाव ठेवण्यात आले ' द सेंच्युरियन्स ' परंतु ते ' स्पार्टाकस ' या पूर्वी येऊन गेलेल्या चित्रपटासारखेच वाटल्याने बदलण्यात आले. ' नॉट फॉर ऑनर अॅन्ड ग्लोरी ' हे बदललेले नावही फार काळ टिकले नाही. शेवटी ते बनले ' लॉस्ट कमान्ड. ' दुसऱ्या चित्रपटासारखे नाव वाटू नये म्हणून बदलून दिलेले हे नाव मात्र अशाच प्रकारच्या अर्धा डझन चित्रपटांच्या नावांसारखेच होते.

एच्. पी. लव्हक्राफ्टच्या ' द हाऊस अॅट द एन्ड ऑफ द वर्ल्ड ' या पुस्तकावर जेव्हा चित्रपट तयार करण्यात आला तेव्हा त्याचे नाव बदलण्यात आले. खरं म्हणजे ही कादंबरी अतिशय लोकप्रिय झालेली. त्यामुळे त्याच नावाचा चित्रपट धडाक्याने चालला असता. परंतु कादंबरीच्या नावात भयानकता, थरारकता नाही असे तज्ज्ञांचे मत पडले आणि त्यामुळे चित्रपटाचे नाव ब्रिटनमध्ये– ' मॉन्स्टर ऑफ टेरर ' असे ठेवण्यात आले तर अमेरिकेत ' डाय मॉन्स्टर डाय ' हे नाव घेऊन हा चित्रपट प्रदर्शित झाला.

विल्यम फॉकनेवर हा विश्वकीर्तीचा लेखक, परंतु त्याच्या ' पायलॉन ' या कादंबरीवर आधारित असलेल्या चित्रपटाचे नाव मात्र बदलले गेले. 'पायलॉन' हे नाव नवीन आहे असा निर्वाळा वितरकांनी दिला. त्यामुळे चित्रपटाचे नाव ' द टार्निश्ड एंजल्स' असे ठेवण्यात आले. अॅगाथा ख्रिस्तीच्या रहस्यकथेवरील चित्रपटाने प्रत्यक्षात धारण केले 'द अल्फाबेट मर्डर्स.' ' एबीसी ' नावाच्या चित्रपट क्षेत्रातील एका बड्या संस्थेशी या ' मर्डर्स 'चा संबंध वाटू नये म्हणून हा सारा खटाटोप करण्यात आला.

## इनोसन्ट सिनर्स

चर्चमधून धान्य चोरून आणून ते भुकेल्या चिमण्यांना देणाऱ्या काही अजाण बालकांची भावस्पर्शी कथा रनर गॉडेन याने आपल्या ' अॅन एपिसोड ऑफ स्पॅरोज् ' या कादंबरीत चितारली आहे. ' रॅन्क ऑर्गनायझेशन' कंपनीने या कादंबरीवर तितकाच तोलामोलाचा चित्रपट तयार केला; परंतु श्री. जॉन डेव्हिस या वितरण विभागाच्या प्रमुखाला कादंबरीचे 'एपिसोड ऑफ स्पॅरोज् ' हे ' चिमणे ' नाव पसंत पडले नाही. त्यामुळे ते बदलून ' इनोसन्ट सिनर्स ' ठेवण्यात आले. या नावावरून हे निष्पाप पाप ' लैंगिक ' असावे अशी प्रेक्षकांची कल्पना झाली. वितरकांनी आपल्या प्रचार–मोहिमेतही यावरच भर दिला. अशा रीतीने बालकांनी केलेल्या चोरीविषयक चित्रपटाची जाहिरात वेगळ्याच प्रकारे होऊ लागली एवढे करूनही हा चित्रपट अपेक्षेप्रमाणे चालला नाहीच.

काही काही वेळा चित्रपट प्रदर्शित केल्यावरही जर तो चालत नसेल तर अखेरचा प्रयत्न म्हणून नावे बदलली जातात. मॉण्टगोमेरी क्लिफ्टची अतिशय प्रभावी भूमिका असलेला सिगमंड फ्रॉईडच्या जीवनावरील ' फ्रॉईड ' हा चित्रपट

नुकताच भारतात येऊन गेला. जॉन हस्टन यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाचे नाव तो प्रदर्शित केल्यावर बदलून 'द सीक्रेट पॅशन' असे ठेवण्यात आले. काही देशांत तर तो 'फ्रॉईड-द सीक्रेट पॅशन' अशाही नावाने प्रदर्शित झाला. (भारतात याच नावाने हा चित्रपट दाखविला गेला.) परंतु अखेरीस इतकी नावे बदलूनही वितरकांना फारसे यश लाभले नाहीच.

## '... मनी कॅन बाय'

'मि. तोपेझ' हा चित्रपट अमेरिकेत बनला. 'द सी वॉल' हे भाबडे नाव घेऊन तयार करण्यात आलेल्या 'आय लाईक मनी', या चित्रपटाचे अखेरीस नाव ठेवण्यात आले 'द अँग्री एज'. चित्रपटातील कशाशीही या नावाचा सुतराम संबंध नव्हता. विल्यम डिटर्ले यांनी पैसा आणि कौशल्य पणाला लावून 'ऑल दॅट मनी कॅन बाय' तयार केला; परंतु पैशाविषयी असणारा हा चित्रपट पैसे देऊन कोणी पाहावयास मात्र येईना, तेव्हा त्याचे पुन्हा बारसे करण्यात आले. नाव ठेवले 'द डेव्हिल अँन्ड डॅनियल वेबस्टर.' एका कुटुंबातील सर्वांत थोरल्या मुलाला त्याने केलेल्या खुनाबद्दल फाशी देण्यात येते. त्या वेळच्या त्याच्या कुटुंबियांच्या भावनांचे मनोज्ञ चित्रण असलेला 'द टॉल हेडलाइन्स' हा चित्रपट बाजारातून काढून घेण्यात आला आणि काही दिवसांनंतर 'द फ्रायटन्ड ब्राइड' या फसव्या नावाखाली तो पुन्हा प्रदर्शित करण्यात आला.

कोलंबिया या विख्यात कंपनीने तर एकदा गंमतच केली. दुसऱ्या महायुद्धात ज्या तळावरून अमेरिकन विमाने टोकियोवर हल्ला करण्यासाठी सुटत त्या लष्करी तळाला नाव देण्याची विनंती प्रे. रूझवेल्ट यांना करण्यात आली. प्रेसिडेंट महाशय उद्गारले, 'शांग्रि-ला'. कोलंबिया कंपनीने ५ वर्षांपूर्वी काढलेल्या 'लास्ट होरायझन' या चित्रपटात थोडासा फेरफार केला आणि त्याला 'द लास्ट होरायझन अॅट शांग्रि-ला' असे नाव देऊन तो पुन्हा प्रदर्शित केला.

जुन्या चित्रपटांना नवी नावे देणे हे हॉलिवूडमध्ये अप्रतिष्ठेचे समजले जात नाही. पूर्वी फार गाजलेले चित्रपट आजही त्याच नावावर भरपूर कमाई करून देतात. 'कॅमेरॉन', 'प्रिझनर ऑफ झेन्डा', 'स्टेजकोच' ही या बाबतींत काही उदाहरणे म्हणून सांगता येतील; परंतु बऱ्याच वेळी जुन्या गाजलेल्या चित्रपटांत थोडासा फेरफार करून त्याला नवे नाव देऊन तो प्रदर्शित केला जातो. 'द अस्फाल्ट जंगल' या चित्रपटाच्या कथेवर आधारित आणखी दोन चित्रपट निघाले! त्याला 'काउबाय' धर्तीचा चित्रपट बनवून टाकून त्याचे नाव ठेवण्यात आले 'बॅडलॅन्डर्स'. त्यानंतर पार्श्वभूमी बदलून त्याच कथेवर चित्रपट काढण्यात आला नि त्याचे नाव ठेवले 'कैरो'. एक विमान रखरखत्या वाळवंटात कोसळते आणि विमानातील बचावलेल्या प्रवाशांवर त्या वैराण वाळवंटात राहण्याची पाळी येते असा कथाभाग असलेला पहिला चित्रपट म्हणजे–'फाइव्ह केम बॅक' (१९३९). सुमारे १६

वर्षांनी याच विषयावर पुन्हा चित्रपट निघाला. त्याचे नाव होते 'बॅक फ्रॉम इटर्निटी' (१९५५). आणि पुन्हा दहा वर्षांनंतर निघालेल्या 'सॅन्ड्स ऑफ द कलहारी' या चित्रपटांची कथा होती याच पूर्वीच्या दोन चित्रपटांची! पूर्वीच्या चित्रपटात वाळवंटातील प्रवाशांना रानटी जमाती हैराण करतात तर 'कलहारी'मध्ये त्याची जागा मोठ्या वानरांनी घेतली आहे. एवढाच काय तो बदल. 'द फ्लाइट ऑफ द फिनिक्स' या चित्रपटाच्या कथेचे 'कलहारी'च्या कथेशीच साधर्म्य होते. फक्त या चित्रपटातील प्रवासी पुन्हा नवे विमान बांधूनच काढण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे कथा एकच. परंतु दिग्दर्शक, पटकथा, लेखक यांनी आपल्याला वाटेल तसे त्यात बदल करून नवनव्या नावांखाली त्याला गोंडस रूप दिले.

'हाऊस ऑफ वॅक्स' या चित्रपटातील विलक्षण थरारकता अजूनही हजारो प्रेक्षकांच्या स्मरणात असेल. परंतु १९५२ साली तयार करण्यात आलेला हा चित्रपट म्हणजे १९३२ सालच्या 'द मिस्टरी ऑफ द वॅक्स म्युझियम' याच चित्रपटाची सुधारीत आवृत्ती होय. याच पद्धतीने करण्यात आलेल्या जुन्या चित्रपटांच्या नावातील पुढील गंमतीदार बदल पाहा—बॅचलर मदर (१९३९), बंडल ऑफ जॉय (१९५६), टू हॅव अ‍ॅन्ड हॅव नॉट् (१९४४), द ब्रेकिंग पॉइन्ट (१९५०) किंवा द गन रनर्स आणि सान्तिगो (१९५६), शांघाय एक्स्प्रेस (१९३२), पेकिंग एक्स्प्रेस (१९५१) इत्यादी.

चित्रपटांच्या नावाबद्दल उसनवारी चालू शकते; परंतु जुन्या चित्रपटातील प्रसंगांची सहीसही नक्कल करणे निश्चितच शिष्टसंमत नाही. या बाबतींत अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे आल्फ्रेड हिचकॉकच्या 'शॅडो ऑफ अ डाऊट' या गाजलेल्या चित्रपटाची युनिव्हर्सल कंपनीने केलेल्या नकलीचे होय. हिचकॉकच्या चित्रपटाची कथा तशीच चितारून ती 'द सायलेन्ट स्ट्रेंजर' या नावाखाली अमेरिकेत दाखविण्यात आली. 'लॉ व्हर्सेस गॅंगस्टर' या वॉर्नर ब्रदर्सच्या चित्रपटाची कथा १९४८ सालच्या 'व्हाईट हीट' सारखीच आहे; एवढेच नव्हे तर त्यातील काही हाणामारीची दृश्येही तशीच वापरण्यात आली आहेत. एकाच चित्रपटाच्या वारंवार आवृत्ती निघण्यात 'द मोस्ट डेंजरस गेम' (१९३२) या चित्रपटाने आघाडी मारली असावी. ब्रिटनमध्ये हा चित्रपट 'द हाऊस ऑफ जॅरॉफ' हे नाव घेऊन आला. १९४४ साली हा चित्रपट पुन्हा तयार करण्यात आला. 'जॉनी अ‍ॅलिग्रो' या नावाखाली १९४६ साली पुन्हा त्याची आवृत्ती काढण्यात आली व ती 'अ गेम ऑफ डेथ' या नावाने दाखविण्यात आली, नंतर दहा वर्षांनी १९५६ साली त्यावर अत्याधुनिकतेचा साज चढविण्यात आला. अर्थात् नाव बदलणे आलेच. 'रन फॉर द सन' या नावाने तो प्रदर्शित झाला.

●

## मेंढरू हरवलं पण....

[पान १६ वरून]

पाडण्याच्या योजना दाखवल्या. संयुक्त संस्थानांचे प्रतिनिधी, वॉर्ड ॲनेन यांनी जी ॲल्युमिनियमची बोट किनाऱ्यावर आढळली तिचेबद्दल विशेष औत्सुक्य दाखविले. कारण त्या बोटीवर कॅनडामध्ये तयार होणाऱ्या एन्जिनचा मार्क असून नं. C 367809 हा होता. याबद्दल कॅराकसमधील कॅनेडियन वकिलाला ह्या मोटारविषयी चौकशी करण्याची विनंती करण्यात आली. आणि थोड्याच दिवसांत कॅनेडिअन सरकारच्या चौकशीचा रिपोर्ट आला. एका कॅनेडियन कंपनीच्या चार मोटर्स मॉंट्रीयलमध्ये दि. १ ऑक्टोबर १९६३ ला क्यूबाने शेतकी सुधारणा, पाणीपुरवठा आदींकरता म्हणून खरेदी केल्या होत्या.

### मतप्रदर्शन

२४ डिसेंबर १९६४ ला अमेरिकन स्टेटस्च्या संघटनेने आपले मत जाहीर केले. व्हेनेझुएलामध्ये कायदेशीर मार्गाने स्थापन झालेले सरकार उलथून पाडण्यासाठी ही शस्त्रास्त्रे व्हेनेझुएलाच्या एका अगदी एकांत किनाऱ्यावर उतरण्यात आली आणि ही उतरलेली सर्व शस्त्रास्त्रे क्यूबाहून पाठविण्यात आली. कॅराकस योजनेचा उद्देश कॅराकस शहर ताब्यात घेणे आणि १ डिसेंबरला होणाऱ्या निवडणुका टाळणे व अशा मार्गांनी सर्व देशभर सत्ता स्थापन करणे हा होता.

आणि या सर्व योजनेला क्यूबाने प्रचार, प्रचार—साहित्य, गनिमी लढयाचे शिक्षण, घातपाती कारवायांचे शिक्षण, शस्त्रास्त्रे पुरवणे या मार्गाने मदत केली आणि हे सर्व आक्रमण योजनेचा भाग म्हणून केले.

११२ पानी रिपोर्ट दिला. या रिपोर्टमध्ये अनेक सत्य घटना व इतर पुरावा दिला होता.

या प्रश्नावर व्हेनेझुएलाने पॅन अमेरिकन संघटनेमार्फत क्यूबाला आक्रमक म्हणून ठरवून त्यावर प्रतिबंधक उपाय योजण्याबद्दल सारखे प्रयत्न चालविले. आणि त्याच तऱ्हेने पिडलेल्या अनेक दक्षिण अमेरिकन राष्ट्रांनी व्हेनेझुएलाला याबाबत पाठिंबा दिला. अखेर व्हेनेझुएला क्युबाला आक्रमक ठरविण्यात यशस्वी झाला आणि पॅन अमेरिकन राष्ट्रांनी क्यूबाच्या कॅस्ट्रो राजवटीशी असलेले आपले व्यापारी, राजनैतिक संबंध तोडले. आणि जर पुढे आक्रमण झाले अगर कॅस्ट्रोने अंतर्गत हस्तक्षेप केला तर परत बैठक न बोलवता त्या आक्रमणाला प्रतिबंध करण्याचे अधिकारही त्या संघटनेला देऊन ठेवले.

●

# लता मंगेशकर

विशेषांकातील लेखांचे मानकरी

卐

प्रा. गंगाधर गाडगीळ

बाबासाहेब पुरंदरे, पंडित भीमसेन जोशी,

वि. स. खांडेकर, सुधीर फडके, उषा मंगेशकर

सी. रामचंद्र, 卐 माधव शिंदे


मुकेश, रोशन

卐 卐 आणि 卐 卐

卐

लता मंगेशकर - खास मुलाखत

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**